❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २८६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



पाच दशकांचा वनवास संपला

हनुमाननगर, चंद्रनगरच्या सूर्या प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मालकी हक्क

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासन निर्णय ग्रामस्थांच्या स्वाधीन; तीन महिन्यांत प्रत्येक लाभार्थ्याला सातबारा
- "स्थानिकांना सोबत घेऊन पालघर जिल्हा राज्यातील पहिल्या पाच विकसित जिल्ह्यांमध्ये आणणार"- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



■ पालघर (दै. संध्या)

सूर्या प्रकल्पांतर्गत धामणी धरणासाठी विस्थापित होऊन पालघर तालुक्यातील हनुमाननगर आणि चंद्रनगर येथे स्थायिक झालेल्या कुटुंबांचा तीन पिढ्यांचा संघर्ष आज संपला. या कुटुंबांना जमिनीचा मालकी हक्क देणाऱ्या शासन निर्णयाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामस्थांच्या स्वाधीन केली. राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत हनुमाननगर येथे हा कार्यक्रम झाला. "आजचा दिवस हा या गावांसाठी सुवर्ण दिवस आहे," अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी या ऐतिहासिक निर्णयाचे महत्त्व अधोरेखित केले.

धामणी धरणासाठी विस्थापित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया सन १९६८ मध्ये सुरू झाली. सन १९७८ पर्यंत या कुटुंबांचे येथे स्थलांतर करण्यात आले आणि सन १९८२ मध्ये पुनर्वसन पूर्ण झाल्याचे जाहीर झाले. मात्र जमिनीची मोजणी, आखणी आणि अभिलेख अधिकार यांची पूर्तता न झाल्याने ही कुटुंबे आपल्याच जमिनीची कायदेशीर मालक होऊ शकली नव्हती. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला पालकमंत्री गणेश नाईक, जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड आणि प्रकल्पग्रस्तांच्या समितीची साथ मिळाली. त्यातून हा प्रश्न मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत पोहोचला. मुख्यमंत्र्यांनी पंधरा दिवसांत प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्याचे निर्देश दिले. मंत्रिमंडळाने गेल्या आठवड्यात त्यास एकमताने मान्यता दिली आणि पाच दशकांचा प्रश्न अवघ्या काही दिवसांत मार्गी लागला.

हा निर्णय कागदावरच न राहता प्रत्यक्षात उतरावा, यासाठी मुख्यमंत्र्यांनी कालबद्ध कार्यक्रम आखून दिला. पुढील तीन महिन्यांत हनुमाननगर व चंद्रनगर येथील प्रत्येक पात्र लाभार्थ्याच्या हाती सातबारा उतारा पोहोचला पाहिजे, असे निर्देश त्यांनी कोकण विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

कागदपत्रांतील त्रुटींमुळे कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत आणि शासन अशा निर्णयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असा विश्वासही त्यांनी दिला. ग्रामस्थांच्या विनंतीनुसार मुख्यमंत्र्यांनी आपल्या वतीने ही दोन्ही गावे जिल्हाधिकाऱ्यांना दत्तक दिली. पायाभूत सुविधांचे पुनर्मूल्यांकन करून ग्रामीण भागातील सर्व मूलभूत सुविधा या गावांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश त्यांनी दिले. निधी किंवा निर्णयाची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे सांगत तीन महिन्यांनंतर आपण स्वतः प्रगतीचा आढावा घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. चंद्रनगर येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे आहे.

जनगणनेच्या प्रक्रियेमुळे सध्या नवीन ग्रामपंचायतींवर निर्बंध आहेत. तरीही प्रस्ताव परिपूर्ण असल्यास जनगणना आयुक्तांची विशेष परवानगी घेऊन चंद्रनगर ग्रामपंचायतीला तातडीने मान्यता दिली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. हा निर्णय केवळ या दोन गावांपुरता मर्यादित राहणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यात विविध प्रकल्पांसाठी पुनर्वसित झालेल्या मात्र अद्याप जमिनीचे हक्क न मिळालेल्या सर्व पात्र प्रकल्पग्रस्तांना याच धर्तीवर न्याय दिला जाईल. वनहक्क पट्टे वाटपात पालघर जिल्हा राज्यात आघाडीवर आहे. शेवटच्या पात्र लाभार्थ्याला पट्टा मिळेपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील आणि वनपट्टेधारकांपर्यंत शासनाच्या सर्व योजनांचे लाभ पोहोचवले जातील, असे त्यांनी सांगितले.

थोडक्यात...

रिक्त पदांचा प्रश्न उच्च न्यायालयात

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह (एमपीएससी) राज्यातील 14 वैधानिक आणि घटनात्मक संस्थांमधील रिक्त पदांचा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला आहे. विद्यार्थी चळवळीतील कार्यकर्ते विवेकानंद पाटील यांनी ॲड. असीम सरोदे यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल केली असून, संबंधित संस्थांमधील रिक्त पदे निश्चित कालमर्यादेत भरण्याचे निर्देश राज्य सरकारला देण्याची मागणी केली आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 226 अंतर्गत दाखल केलेल्या या याचिकेत, राज्यातील सुमारे चार लाख स्पर्धा परीक्षा उमेदवारांवर या परिस्थितीचा परिणाम होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. दीर्घकाळ पदे रिक्त राहिल्याने भरती प्रक्रिया, तक्रार निवारण, अर्धन्यायिक कामकाज आणि प्रशासकीय कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याचे याचिकेत नमूद केले आहे. यामुळे संविधानातील समानतेचा आणि जीवनाच्या अधिकाराचा प्रश्नही निर्माण होत असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. याचिकेतील आकडेवारीनुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील मंजूर 270 पदांपैकी 92 पदे रिक्त आहेत. राज्य मानवी हक्क आयोगातील 54 पैकी 29, महिला आयोगातील 35 पैकी 15, राज्य माहिती आयोगातील 146 पैकी 56, लोकायुक्त संस्थेतील 87 पैकी 33 आणि राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील 497 पैकी 125 पदे रिक्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

केरळमध्ये SIR योग्य, महाराष्ट्रात मात्र पोटदुखी

मुंबई : दैनिक संध्या

"दिल्लीत बसून 'काँग्रेस जिताऊ पार्टी'च्या (CJP) माध्यमातून एसआयआर (SIR - विशेष मतदार पुनरीक्षण मोहीम) आणि केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात नौटंकी सुरू आहे. राहुल गांधी आणि त्यांच्यासोबत आलेल्या डाव्या, अतिडाव्या तसेच हिंदुत्वविरोधी शक्तींनी आधी देशाच्या इतिहासाची पाने चाळावीत. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापासून ते डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळापर्यंत देशात किमान सात ते आठ वेळा एसआयआरची प्रक्रिया कायदेशीरपणे पार पडली. काँग्रेसच्या काळात एसआयआर झाले तर ते योग्य आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात झाले की लोकशाहीचा गळा घोटला गेला, हा काँग्रेसचा दुटप्पीपणा आणि ढोंगीपणा आहे," असा जोरदार हल्लाबोल भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केला आहे. भाजपच्या प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत नवनाथ बन यांनी अधिकृत आकडेवारी, मतदार यादी शुद्धीकरणाची वस्तुस्थिती आणि काँग्रेसच्या सत्ताकाळातील निवडणूक आयुक्तांच्या राजकीय लाभांचा इतिहास मांडत विरोधकांना फैलावर घेतले. "काही लोक झोपेतून उठले आणि एका दिवसात ही मोहीम राबवली असे अजिबात नाही. देशात ही प्रक्रिया राबवण्यासाठी चार ते पाच महिन्यांचा पुरेसा कालावधी देण्यात आला होता.

पोलिसांनो, सरकारचे बेकायदेशीर आदेश पाळू नका : संजय राऊत

■ मुंबई (दै. संध्या)

"देशभरात पेटलेला जनक्षोभ आणि जनतेचे हे उफाळलेले बंड आता दडपणे कोणालाही शक्य नाही. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या जुलमी सरकारच्या पतनाची उलटी गिनती सुरू झाली आहे. लिहून ठेवा, पुढील सहा महिन्यांत म्हणजेच मार्च ते एप्रिल महिन्यापर्यंत मोदी सरकार आपला शेवटचा श्वास घेईल आणि देशात निवडणुका होईपर्यंत सर्व पक्षांचे मिळून एक पर्यायी 'राष्ट्रीय सरकार' स्थापन होईल," असा खळबळजनक राजकीय दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी दिल्लीतील इंडिया आघाडीचे आंदोलन, निवडणूक आयोगाची कथित मनमानी, पोलिसांकडून आंदोलकांची होणारी धरपकड, पुण्यातील एमपीएससी आंदोलन आणि देशातील राजकीय स्थितीवर नेहमीच्या आक्रमक आणि रोखठोक शैलीत चौफेर हल्ला चढवला. केंद्र सरकारच्या भूमिकेची चिरफाड करताना संजय राऊत म्हणाले, "व्यापाऱ्यांचे सरकार हे नेहमीच घाबरट असते. हे लोक खरे राज्यकर्ते नसून व्यापारी आहेत. एखादा खंबीर हृदयाचा नेता असता, तर तो मैदानात उतरून जनतेच्या मागण्या समजून घेता. मात्र, हे सरकार स्वतःच्या दाराला आतून कुलूप लावून भूमिगत झाले आहे." "विरोधी पक्ष आणि देशातील तरुण आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरत असताना त्यांना 'कॉक्रोच', 'मच्छर' आणि 'माशी' म्हणून हिणवले जाते. पण एका मच्छरने संपूर्ण सरकारला हतबल बनवून टाकले आहे. माशी मारण्यासाठी थेट हातोडा उगारणारी ही कोणती मानसिकता आहे? तरुणांना आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या विरोधकांना थेट दहशतवादी आणि देशद्रोही ठरवले जात आहे." "ब्रिटिशांनी 1919च्या काळात ज्याप्रमाणे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आंदोलने चिरडण्यासाठी काळा 'रौलट ॲक्ट' आणला होता, तोच जुलमी फॉर्म्युला आज नरेंद्र मोदी आणि अमित शहा देशात राबवत आहेत. मात्र, हा इतिहास विसरू नका; इंग्रजांप्रमाणेच या सरकारचाही अंत निश्चित आहे." आंदोलनकर्त्यांवर होणाऱ्या कारवाईवरून त्यांनी पोलिसांना थेट आवाहन केले. "माझे हे विधान कदाचित सत्ताधाऱ्यांना राष्ट्रविरोधी वाटेल; परंतु आणीबाणीच्या काळात लोकनायक जयप्रकाश नारायण आणि चौधरी चरणसिंग यांनीही पोलिसांना हेच आवाहन केले होते.



जेव्हा सत्ताधारी पोलिसांच्या माध्यमातून विरोधकांचे दमन करतात, तेव्हा पोलिसांचे कर्तव्य संविधानाचे रक्षण करणे असते. त्यामुळे मी पुन्हा बजावतो की पोलिसांनी सरकारचे बेकायदेशीर आदेश पाळू नयेत. सामान्य तरुणांना आणि आंदोलकांना नोटिसा पाठवून ताब्यात घेण्याच्या या बेकायदेशीर कृत्यात पोलिसांनाही स्वतःहून कोणताही रस उरलेला नाही, हे स्पष्ट दिसते आहे."

भाषण मी केले तर मला अटक का नाही करत?

रोहित पवारांचा सवाल- चोराला पाठीशी घालून विद्यार्थ्यांवर गुन्हे? PG-हॉस्टेलवर पोलिसांकडून 'दहशतवादी' नोटिसा पाठवून धमकावले

■ पुणे (दै. संध्या)

"एमपीएससीमधील (MPSC) मूळ भ्रष्टाचारी चोराला जोपर्यंत गजाआड केले जात नाही, तोपर्यंत परीक्षा देऊन काहीही साध्य होणार नाही; केवळ पैशांचे व्यवहार आणि दलालांचे खिसे भरणेच चालू राहील. म्हणूनच आयोगाच्या वादग्रस्त अध्यक्षांची हकालपट्टी होईपर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा विद्यार्थ्यांचा निर्धार आहे. आंदोलनात मी पुढाकार घेतला, मी भाषण केले, तरीही माझ्यावर कारवाई न करता गरीब विद्यार्थ्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. रात्रीच्या वेळी हॉस्टेल आणि पीजी चालकांना 'दहशतवादी, परदेशी नागरिक लपले आहेत का?' अशा आशयाच्या नोटिसा पाठवून पोलिसांमार्फत विद्यार्थ्यांना धमकावले जात आहे. मित्राला वाचवण्यासाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या आणि गृहमंत्र्यांच्या दबावातून पुणे पोलीस काम करत आहेत," असा संतप्त व घणाघाती आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या आंदोलनाचा विस्तार आता 3 हजार विद्यार्थ्यांवरून तब्बल 50 हजारांच्या वर गेला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी विश्रामबाग पोलिसांनी दाखल केलेले एकामागोमाग एक दोन एफआयआर, विद्यार्थ्यांची होणारी धरपकड आणि प्रशासकीय दडपशाहीवरून सरकारची कठोर शब्दांत पोलखोल केली. विश्रामबाग पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या पहिल्या एफआयआरमधील विसंगतींवर बोट ठेवत रोहित पवार म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून 1 तारखेला संध्याकाळी आम्ही एस. एम. जोशी पुलावर बसण्याचा निर्णय घेतला. या पुलाच्या दोन्ही बाजूला स्मशानभूमी आहे, तिथे शाळा किंवा रुग्णालये नाहीत, वर्दळ कमी असते. शिवाय २ तारखेची आम्हाला रीतसर परवानगी होती." "पोलिसांनी एफआयआरमध्ये ज्या 14-15 जणांची नावे टाकली आहेत, त्यांपैकी चार जण त्या दिवशी पुण्यात किंवा आंदोलनस्थळी नव्हतेच; ते दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी गावातून आले. पोलिसांनी अंधपणे एफआयआर नोंदवला असून, त्यामध्ये मुला-मुलींच्या लिंगाचीही चुकीची नोंद केली आहे. एका गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने पत्रकाराला मारहाण केली, त्याला कार्यकर्त्यांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले; पण त्याचेही नाव एफआयआरमध्ये टाकून आंदोलक म्हणून दाखवले गेले." पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईची त्यांनी धक्कादायक माहिती दिली, "काल मध्यरात्री 1 ते 2च्या सुमारास पुणे पोलिसांनी नवी पेठ, सदाशिव पेठ आणि परिसरातील खासगी वसतिगृहे व पीजी चालकांना नोटिसा बजावल्या. त्या नोटीसमध्ये लिहिले आहे की, 'दहशतवादी कारवाया करणारे, आंतरराष्ट्रीय किंवा परराज्यातील गुन्हेगार लपले आहेत का याची माहिती द्या.'



माझ्यावर कारवाई का नाही?

"मी तिथे उपस्थित होतो, मी भाषण केले आणि आंदोलनाचा निर्णय झाला. मी पोलिसांना स्पष्ट विचारले की, माझे नाव एफआयआरमध्ये का नाही? तर पोलीस म्हणतात 'तपास चालू आहे'. बड्या नेत्यांवर एफआयआर करताना तुम्हाला आधी तपास करावा लागतो, आणि निष्पाप गरीब विद्यार्थ्यांवर मात्र एका रात्रीत गुन्हे नोंदवता? हिंमत असेल तर विद्यार्थ्यांवर हात टाकण्याऐवजी मला अटक करा," असे आव्हान रोहित पवारांनी दिले."

राज्यात मानसिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण करणार

मंत्री प्रकाश आबिटकर : टेली-मानस हेल्पलाइनला ३ लाख २७ हजारांहून अधिक कॉल्स

■ मुंबई (दै. संध्या)

मानसिक आरोग्याविषयी जनजागृती, समुपदेशन आणि उपचार सेवा अधिक सुलभ करण्यासाठी राज्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. टेली-मानस हेल्पलाइन, मनशक्ती क्लिनिक, स्मृतीदोष क्लिनिक आणि मनोसामाजिक पुनर्वसन सेवांच्या माध्यमातून मानसिक आरोग्य सेवांचे जाळे बळकट करण्यावर सार्वजनिक आरोग्य विभागाचा भर आहे. मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून नागरिकांना वेळेत मदत मिळावी, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त (१० ऑक्टोबर) राज्यात 'मनजागृती' आणि 'मनसंवाद' या संदेशांतून मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. यंदाची जागतिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून त्यातून सकारात्मक बदल घडविण्याची आहे. मानसिक आरोग्याच्या समस्यांचा सामना करणाऱ्या व्यक्तींना केवळ ऐकून घेणे पुरेसे नसून, त्यांच्या अनुभवांना सेवा आणि निर्णयप्रक्रियेत स्थान मिळणे आवश्यक आहे.



टेली-मानसला तीन लाखांहून अधिक कॉल्स

मानसिक ताण, चिंता, नैराश्य तसेच अन्य मानसिक आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन मिळावे, यासाठी टेली-मानस ही २४ तास उपलब्ध असलेली राष्ट्रीय हेल्पलाइन सुरू आहे. राज्यात २०२२-२३ पासून एप्रिल २०२६ पर्यंत या सेवेला तीन लाख २७ हजारांहून अधिक कॉल्स प्राप्त झाले आहेत. मानसिक आरोग्यविषयक मदतीसाठी नागरिकांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधता येत असल्याने या सेवेचे महत्त्व वाढले आहे. टेली-मानस हेल्पलाइन क्रमांक १४४१६ असा आहे.

मानसिक आरोग्यविषयक सेवा नागरिकांच्या जवळ उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर मनशक्ती क्लिनिकच्या माध्यमातून सेवा देण्यावर भर दिला जात आहे. मानसिक आरोग्याच्या समस्यांची वेळीच ओळख, समुपदेशन, उपचार आणि आवश्यकतेनुसार पुढील वैद्यकीय सेवांसाठी संदर्भ देणे, यामुळे रुग्णांना मदत मिळू शकते. मानसिक आरोग्याच्या समस्यांचा सामना करणाऱ्या व्यक्तींचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनर्समावेशन यांसाठीही प्रयत्न केले जात आहेत.

वाढत्या वयात जाणवणाऱ्या स्मरणशक्तीशी संबंधित समस्यांचे निदान आणि उपचार करण्यासाठी स्मृतीदोष क्लिनिकच्या माध्यमातून विशेष बाह्यरुग्ण सेवा दिल्या जात आहेत. या क्लिनिकमध्ये दरवर्षी सुमारे ४५ हजारांहून अधिक नागरिक लाभ घेत असल्याची माहिती आहे. स्मृतीदोष असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसह त्यांच्या कुटुंबीयांना मार्गदर्शन आणि आवश्यक वैद्यकीय मदत मिळवून देण्यात या सेवांची भूमिका महत्त्वाची आहे.


स्वयंसेवी संस्थांचाही सहभाग

मानसिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी शासनासोबत स्वयंसेवी संस्थांचा सहभागही घेतला जात आहे. आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट, एकलव्य फाउंडेशन आणि श्रद्धा फाउंडेशन यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने जनजागृती, समुपदेशन आणि समुदायस्तरावरील मदतीसाठी प्रयत्न केले जात आहेत. शासन, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांच्या समन्वयातून मानसिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्याचे उद्दिष्ट आहे.

पुणे पदवीधर-शिक्षक मतदारसंघात ४७ आणि ३० उमेदवार रिंगणात

■ पुणे (दै. संध्या)

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पुणे विभागात प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. या दोन्ही मतदारसंघांसाठी येत्या २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे मतमोजणी होणार आहे. पदवीधर मतदारसंघातून ४७, तर शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पुणे विभागाच्या विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी ही माहिती दिली. त्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. या दोन्ही मतदारसंघांचे कार्यक्षेत्र पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांमध्ये आहे. संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ३ लाख ८८ हजार मतदार असून, त्यांच्यासाठी ७४१ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. तर शिक्षक मतदारसंघासाठी ६२ हजार मतदार असून, त्यांच्यासाठी ३१० मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. अशा प्रकारे दोन्ही मतदारसंघांत मिळून सुमारे ४ लाख ५० हजार मतदार १,०५१ मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावणार आहेत. पदवीधर मतदारसंघासाठी एकूण ७५ उमेदवारांनी ८७ नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. छाननीनंतर ७० उमेदवारांचे ८१ नामनिर्देशन अर्ज वैध ठरले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी, ९ ऑक्टोबर रोजी २३ उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर अंतिमतः ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. शिक्षक मतदारसंघासाठी एकूण ४९ उमेदवारांनी ६७ नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. छाननीनंतर ४८ उमेदवारांचे ६५ नामनिर्देशन अर्ज वैध ठरले.



■ २३ ऑक्टोबरला मतदान, २७ ऑक्टोबरला बालेवाडीत मतमोजणी होणार

संपादकीय

नरेंद्र मोदीच्या कारकिर्दीची पंचविशी!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील पंचवीस वर्षाचा प्रवास परिवर्तनाचा अभ्यास करण्याजोगा अध्याय आहे.७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झालेले आहेत. गुजरात पासून दिल्लीपर्यंत हा प्रवास भारतीय राजकारणातील एका प्रदीर्घ पर्वाची नोंद करणार आहे. मोदी यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात सत्तेच्या केंद्रातून झालेली नाही भारतीय जनसंघ आणि सध्याचा भारतीय जनता पक्ष यांची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेत स्वयंसेवक प्रचारक म्हणून त्यांनी कार्याला सुरुवात केली. संघटनात्मक कार्य. समाजाशी संपर्क. जनआंदोलनाचा अनुभव. आणि भारतीय जनता पक्षातील दीर्घ काळाचे संघटनात्मक काम. या प्रक्रियेतून त्यांचे नेतृत्व घडलेले आहे.१९७४ मधील गुजरात येथील विद्यार्थी आंदोलन आणि आणीबाणीच्या काळातील भूमिगत जनजागरणाचा अनुभव त्यांच्या राजकीय जडणघडणीतील महत्त्वाचा टप्पा ठरला. संघटनात्मक कार्य. राजकारणातून प्रशासनाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचलेले नेतृत्व म्हणून मोदींच्या प्रवासाकडे पहावे लागेल. २००१ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्यासमोर पहिली मोठी प्रशासकीय परीक्षा होती. ती भूकंपानंतरच्या पुनर्वसनाची त्या काळातील प्रशासनात उद्दिष्ट. वेळ. मर्यादा. आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिणाम यांना केंद्रस्थानी ठेवण्याची कार्यपद्धती पुढे त्यांच्या प्रशासन शैलीची ओळख बनली. गुजरातच्या विकासाच्या मॉडेलवर समर्थन आणि टीका दोन्ही प्रकारचे भूमिका मांडल्या गेल्या मात्र औद्योगिक गुंतवणूक पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील तंत्रज्ञाचा वापर यामुळे गुजरातच्या विकासाची चर्चा राष्ट्रीय पातळीवर पोहोचली २६ मे २०१४ रोजी नरेंद्र मोदी यांनी भारताच्या पंतप्रधान पदाची सूत्रे स्वीकारली. आणि गुजरातच्या यशस्वी प्रयोगांना राष्ट्रीय पातळीवरील व्यापक विकासाच्या अजेठ्याशी जोडण्याचा प्रयत्न सुरू केला. जनधन योजना. मुद्रा. स्टार्टअप. डिजिटल इंडिया. स्वच्छ भारत. उज्वला. घरकुल जलजीवन मिशन. या पायाभूत सुविधाचा विस्तार आणि डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रातील यूपीआय यासारख्या उपक्रमांनी शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संबंध अधिक तंत्रज्ञाधारित केले. मोदी यांच्या नेतृत्वाच्या २५ वर्षाचे प्रवासाचे मूल्यमापन करताना केवळ योजनांची यादी पुरेशी ठरणार नाही. या काळात लाभार्थ्यापर्यंत पोहोचली हा दृष्टिकोन अधिक ठळक झाला. बँक खाते. थेट लाभ हस्तांतरण. घर. शौचालय. नळाचे पाणी. गॅस कनेक्शन. अशा मूलभूत सुविधांच्या माध्यमातून वंचित घटकापर्यंत शासन पोहोचवण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. त्याचवेळी डिजिटल अर्थव्यवस्था आणि यूपीआयने दैनंदिन व्यवहाराची पद्धत मोठ्या प्रमाणात बदलली. आत्मनिर्भर भारत हा मोदी सरकारच्या दुसऱ्या महत्त्वाच्या विचारांपैकी एक ठरला. संरक्षण उत्पादन. इलेक्ट्रॉनिक्स. औषध निर्मिती. अंतराळ क्षेत्र. आणि उत्पादन क्षेत्रात देशांतर्गत क्षमता वाढविण्यावर भर देण्यात आला. संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत झालेली वाढ. देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन. आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेली मोठी गुंतवणूक. ही या देशातील काही ठळक उदाहरणे आहेत. त्याचबरोबर कलम ३७०. ३ तलाक. आणि अयोध्येतील राम मंदिरासारखे दीर्घकाळ राजकीय चर्चेत असलेले विषयही मोदी सरकारच्या काळात निर्णायक टप्प्यावर पोहोचले.या निर्णयाची राजकीय. सामाजिक.आणि घटनात्मक मूल्यमापन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून होत राहील. परंतु भारतीय राजकारणाच्या अजेंड्यावर त्याचा प्रभाव नाकारता येणार नाही. २५ वर्षाच्या प्रवासात महाराष्ट्राचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे उद्योग. शेती. सहकार. शिक्षण.विज्ञान. संस्कृती.आणि सामाजिक सुधारणाची समृद्ध परंपरा असलेल्या महाराष्ट्रासाठी मोठ्या पायाभूत प्रकल्पांना केंद्र सरकारच्या धोरणाचा आधार मिळाला. मुंबईतील लिंक रस्ता.समृद्धी महामार्गाच्या संबंधित पायाभूत सुविधा. वाढवण बंदर. नवी मुंबई विमानतळ.प्रकल्प महामार्ग. आणि रेल्वे प्रकल्प या विविध क्षेत्रांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून मोठी कामे पुढे आली.व कामे सुरु आहेत.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीशी संबंधित लंडनमधील स्मारक. हिंदू मिल स्मारकाचा प्रश्न. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा जागतिक वारसा यादीतील समावेश.अशा सांस्कृतिक व ऐतिहासिक बाबींना या काळात बळ मिळाले. महाराष्ट्रात एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष गाठण्याच्या दिशेने पुढे नेण्याची चर्चा सुरू झाली असून विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राने भूमिका बजावावी ही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मोदी यांच्या कारकीर्दीचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची राजकीय संवाद शैली. आणि जनसंपर्काची पद्धत.मनकी बात पासून सोशल मीडिया डिजिटल संवाद. आणि थेट जनतेची संपर्काच्या विविध माध्यमातून त्यांनी पारंपारिक राजकीय संवादाला नवे स्वरूप दिले. समर्थकांसाठी हे प्रभावी जनसंपर्काचे माध्यम आहे. तर विरोधक या शैलीकडे वेगळ्या दृष्टीने पाहतात.लोकशाहीत मतभिन्नता स्वाभाविक आहे. मात्र मोदी यांनी भारतीय राजकारणातील नेतृत्व प्रचार आणि जनसंवादाच्या पद्धतीवर कायम स्वरूप प्रभाव टाकला आहे. हे विशेषत्वाने नोंदवावे लागेल.२५ वर्षाच्या या प्रवासाचे पुढील लक्ष विकसित भारत २०४७ हे आहे.भारताला विकसित अर्थव्यवस्था बनविण्याबरोबरच तंत्रज्ञान. पायाभूत सुविधा. सामाजिक समावेशकता. महिला सक्षमीकरण. आत्मनिर्भरता. आणि सांस्कृतिक वारसा याचा समन्वय साधण्याचे आव्हान मोदी सरकार समोर आहे. मोठी स्वप्ने मांडणे जितके महत्त्वाचे आहे.तितकेच त्या स्वप्नाची अंमलबजावणी आणि त्याचे परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनात दिसणे महत्त्वाचे ठरणार आहे. नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाची २५ वर्षे पूर्ण होत असताना त्यांच्या कारकिर्दीकडे केवळ समर्थक किंवा विरोधक या दोन चौकटीतून पाहण्याऐवजी भारतीय लोकशाही प्रशासन अर्थव्यवस्था आणि समाज जीवनावर झालेला व्यापक परिणाम यांनी निकषावर पाहण्याची गरज आहे. या प्रवासात उपलब्धी खूप आहेत. मोठी आव्हाने आहेत. मतभेद आहेत. आणि भविष्यासाठी अपेक्षाही आहे. गुजरातच्या मुख्यमंत्रीपदापासून देशाच्या पंतप्रधान पदापर्यंतचा हा २५ वर्षाचा प्रवास भारतीय राजकारणातील एक महत्त्वपूर्ण कालखंडाची नोंद करणे आवश्यक आहे. पुढील काळात विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणताना मोदी नेतृत्वाची खरी कसोटी लागणार आहे.२५ वर्षाचा अनुभव. जनादेश आणि धोरणात्मक सातत्य याच्या बळावर भारताला पुढील टप्प्यावर नेण्याचे आव्हान आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशातील सर्वसामान्य जनतेचा कौल कोणाला निर्णायक ठरतो. ते पहावे लागेल.

जीव संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार; समर्थ फार्मसीमध्ये सप्ताहाची सांगता

■ जुन्नर (दै. संध्या)



समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वन्यजीव सप्ताह विविध शैक्षणिक,जनजागृतीपर,सर्जनशील व पर्यावरणपूरक उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला.विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संरक्षण,जैवविविधता संवर्धन,पर्यावरण संरक्षण,वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच मानव-वन्यजीव सहअस्तित्वाची जाणीव निर्माण करणे हा सप्ताहाचा प्रमुख उद्देश होता.

सप्ताहाच्या सांगता समारंभास वनपरिक्षेत्र अधिकारी,ओतूर चैतन्य कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांनी 'जुन्नरमधील बिबट्या व्यवस्थापन ते जैवविविधता रक्षण : तांत्रिक दृष्टिकोन आणि वन प्रशासनाची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले. बिबट्यांचा अधिवास,त्यांच्या संख्येचे शास्त्रीय मूल्यांकन,रेस्क्यू प्रक्रिया, मानव-बिबट्या संघर्षाची कारणे आणि संघर्ष टाळण्यासाठीच्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली.बिबट्या आढळल्यास त्याच्या जवळ न जाणे,त्याला चिथावणी न देणे आणि तात्काळ वन विभागाला माहिती देणे,असे आवाहन त्यांनी केले.

सप्ताहदरम्यान 'औषधी वनस्पती : औषधनिर्मितीतील महत्त्व व वनस्पती विविधता' या विषयावर प्रा.डॉ.संजयकुमार रहांगदळे यांनी मार्गदर्शन केले. 'सर्पविषापासून औषधनिर्मितीपर्यंत' या विषयावर डॉ.सदानंद राऊत यांनी सर्पदंशाबाबतचे गैरसमज दूर करून वैज्ञानिक उपचारपद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले.तसेच रमेश खरमाळे यांनी 'मानवी जीवनातील पर्यावरणाचे महत्त्व', रणजित शानभाग यांनी 'सह्याद्रीतील पक्षी वैविध्य आणि त्यांचे संवर्धन', तर तुषार पवार यांनी 'भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याची जैवविविधता आणि सहअस्तित्व' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सप्ताहानिमित्त चित्रकला,पोस्टर सादरीकरण,वक्तृत्व,प्रश्नमंजुषा आणि रांगोळी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.चित्रकला स्पर्धेत सिद्धेश लंके विजेता,तर सई जाधव उपविजेती ठरली.पोस्टर सादरीकरणात ऋतुजा कणसे व अनुराधा वाघ विजेत्या,तर प्रसाद डोईफोडे उपविजेता ठरला. वक्तृत्व स्पर्धेत वैष्णवी जाधव विजेती,तर वैष्णवी मोरे उपविजेती ठरली.प्रश्नमंजुषेत शिल्पा कन्हे व सुयश घाटकर यांनी विजेतेपद मिळविले. रांगोळी स्पर्धेत गौरी गुंजाळ व वैष्णवी चौधरी विजेत्या,तर स्वरांजली झिंजाड व वैष्णवी मोरे उपविजेत्या ठरल्या.

सांगता समारंभात विविध स्पर्धांतील विजेत्या व उपविजेत्या विद्यार्थ्यांना संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके व वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र,सन्मानचिन्ह व एक रोपटे देऊन गौरविण्यात आले.यावेळी वनपरिमंडळ अधिकारी सचिन सपकाळ,क्षेत्र अधिकारी विश्वराज साळुंखे,तसेच कैलास भालेराव,स्वप्निल केदारी व विशाल गुंड उपस्थित होते. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत व प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्राची पडवळ यांनी केले.डॉ.सचिन दातखिळे यांनी प्रास्ताविकातून सप्ताहाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. सप्ताहातील विविध उपक्रमांचा आढावा समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके यांनी घेतला, तर समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले यांनी आभार मानले.

शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के थेट शेतकऱ्यांच्या बांधावर - कवठे येमाई येथे जळालेल्या पिकांची पाहणी

■ कवठे येमाई(दै. संध्या)



पावसाअभावी खरीप हंगामातील पिके जळून जाण्याच्या मार्गावर असताना शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांनी आज शुक्रवार दि. ०९ रोजी भर उन्हात थेट शेताच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. कवठे येमाई येथे त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन जळालेल्या पिकांची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली. यावेळी संबंधित महसूल अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावर्षी पावसाने मोठा ताण दिल्याने परिसरातील शेतीसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. पाण्याअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके करपू लागली आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने आणि खर्चाने उभी केलेली पिके डोळ्यांदेखत जळून जात असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नी आस्था असणारे शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. युवा क्रांतीचे राष्ट्रीय मीडिया प्रमुख तथा राष्ट्रीय ज्येष्ठ सल्लागार, वरिष्ठ पत्रकार प्राध्यापक सुभाष शेटे यांच्या शेतावरही तहसीलदार मस्के यांनी भेट देत जळालेल्या पिकाची पाहणी केली. पिकांच्या नुकसानीची तीव्रता लक्षात घेऊन त्यांनी मंडलाधिकारी विजय फलके आणि ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव यांना संबंधित नुकसानग्रस्त शेतांची तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश दिले. जास्तीत जास्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या जळालेल्या, करपलेल्या पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यात दुष्काळसदृश पंचनाम्यांना वेग

■ यवत (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात 'ट्रिगर १' लागू झाल्यामुळे तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार यांच्या आदेशानुसार संपूर्ण तालुक्यात गेल्या ३० सप्टेंबरपासून नुकसान भरपाई व पंचनाम्याचे कामकाज युद्धपातळीवर सुरू आहे.

प्रशासनाला १० ऑक्टोबर रोजी अंतिम अहवाल सादर करावयाचा असल्याने, ज्या शेतकऱ्यांचे पंचनामे अद्याप बाकी आहेत त्यांनी तातडीने संबंधित पथक प्रमुकांशी संपर्क साधून आपले पंचनामे पूर्ण करून घ्यावेत, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी केले आहे.

पंचनामे विनाअडथळा पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून विशेष नियुक्ती करण्यात आली असून, यामध्ये कामटवाडी, जावजी बुवाचीवाडी आणि तांबेवाडीचे ग्राम महसूल अधिकारी, नांदूरचे सहाय्यक कृषी अधिकारी तसेच बोराटेवस्तीचे ग्रामपंचायत अधिकारी यांची पथक प्रमुख म्हणून जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

कोणताही पात्र शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहू नये, यासाठी तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्ड तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व संबंधित शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी आपले पंचनामे करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

महादेव मंदिरासमोरील विहिरीच्या स्वच्छतेला तातडीने सुरुवात

■ कवठे येमाई (दै. संध्या)



बातमीचा परिणाम दिसू लागला! - तीव्र दुष्काळाची चाहूल लागताच कवठे गावठाणातील महादेव मंदिरासमोरील विहीर व परिसराच्या स्वच्छता मोहिमेला आजपासून सुरुवात झाली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने हालचाली करत नागरिकांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या आहेत.जेसीबीच्या साहाय्याने परिसराची साफसफाई करण्यात येणार असून, विहिरीतील जुने पाणी उपसून विहीर वापरासाठी तयार केली जाणार आहे. विहिरीत छोटी मोटार बसवून पाच हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी तात्काळ उभारण्यात येणार आहे. या टाकीतून नागरिकांना वापरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. तसेच मंदिर परिसरात रात्री प्रकाशव्यवस्था करण्यासाठी खांबावर दिवा बसवण्यात येणार आहे.

शिरूर पंचायत समितीचे कार्यक्षम विस्तार अधिकारी तथा प्रशासक बी. आर. गावडे, ग्रामविकास अधिकारी पूनम थोरात व शितलकर यांच्या तत्परतेने ही कार्यवाही सुरू झाली आहे.यावेळी माजी उपसरपंच विठ्ठलराव मुंजाळ,माजी ग्रामपंचायत सदस्य डॉ. विकास शेटे, मिठ्ठलाल बाफना, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी अर्जुन शिंदे, पोलीस पाटील गणेश पवार आणि कर्मचारी गणेश दळवी उपस्थित होते. मंदिर परिसरात वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी विहीर व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे.

शिक्षण व संशोधनात ए आय साधनांचा वापर या विषयावर एकदिवसीय हँड्स-ऑन प्रशिक्षण संपन्न

■ बारामती(दै. संध्या)



तुळजारामचतुरचंद महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभाग आणि उद्योजकता विकास कक्ष (ईडी सेल) यांच्या वतीने टी.वाय.बी.एस्सी. (संगणकशास्त्र) व एम.एस्सी. (संगणकशास्त्र) विद्यार्थ्यांसाठी 'यूज ऑफ एआय टूल्स इन ऍकॅडेमिक्स अँड रिसर्च' (शिक्षण व संशोधनात एआय साधनांचा वापर) या विषयावर एकदिवसीय हँड्स-ऑन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात व्ही.पी.के. बी.आय.ई.टी. येथील आयटी विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रदीप मुकुंदराव पठाणे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी शिक्षण व संशोधनात एआय टूल्सचा वापर याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयन प्रा.कोमल थेऊरकर यांनी केले. कार्यक्रमास संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.उपेंद्र चौधरी, ईडी सेलच्या प्रमुख प्रा.प्राजक्ता कुलकर्णी यांच्यासह संगणकशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य तसेच 'आयक्यूएसी' समन्वयक यांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन लाभले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) यांनी शुभेच्छा दिल्या.

जेजुरी पालिकेसमोर आरपीआयच्या वतीने विविध मागण्यासाठी आंदोलन

■ जेजुरी (दै. संध्या)



जेजुरीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम त्वरित सुरू करावे, बाजार पटांगणातील जागा नगरपरिषदेने ताब्यात घ्यावी आदी मागण्यासाठी जेजुरी नगरपरिषदेच्या समोर आरपीआयच्या वतीने पुणे जिल्हा आरपीआयचे माजी अध्यक्ष पंढरीनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 965 विकसित करण्यासाठी जेजुरी नगरपरिषदेसमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हटविण्यात आला होता. शासनाच्या माध्यमातून पुतळ्या सह स्मारक उभारण्याचे आश्वासन देण्यात आले होते मात्र दोन वर्षे होऊन ही ही काम रेंगाळले आहे. नगरपरिषदेने पुढाकार घेऊन हे काम त्वरित सुरू करावे, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात नामफलक लावावा,जेजुरी येथील जिल्हा परिषद शाळेची दुरवस्था झाली असून ही जागा पालिकेने ताब्यात घेऊन प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करावी. ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा सेंटर साठी जेजुरी नगरपरिषदेने जागा उपलब्ध करून देऊन ही ही सेंटर अद्याप सुरू झाले नाही. हे सेंटर लवकर सुरू करावे, जेजुरी शहरापासून दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असणारे वीज वितरण कार्यालय, मंडल अधिकारी कार्यालय जेजुरी शहरात सुरू करावे याबाबत आरपीआयच्या वतीने सतत पत्रव्यवहार करून ही सर्व कामे प्रलंबित आहेत. शासनाला जागे करण्यासाठी एक दिवसाचे आंदोलन करून आपल्या मागणी बाबत जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांना निवेदन देण्यात आले असल्याचे आंदोलक पंढरीनाथ जाधव यांनी सांगितले. या आंदोलनावेळी आरपीआयचे पश्चिम महाराष्ट महिला आघाडीच्या अध्यक्षा संगीता आठवले, पुणे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम, तसेच जिल्हा, तालुका व जेजुरी शहराचे पदाधिकारी गौतम भालेराव, बळीराम सोनवणे, कालिदास उबाळे, सचिन कांबळे, चक्रधर सोनवणे, छाया मोरे, कुंडलिक सोनवणे, पोपट भोसले, दीपक भालेराव, योगेश भालेराव, रवींद्र काकडे, विजय भालेराव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



आरोग्य जनजागृती व समुपदेशन शिबिर

पुणे : दैनिक संध्या

कर्मचाऱ्यांचे आरोग्य जपणे, विविध आजारांबाबत जनजागृती करणे आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करणे, या उद्देशाने क्लीन सायन्स कंपनीत आरोग्य जनजागृती व समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय प्रशासन अधिकारी, पुणे यांच्या अंतर्गत सेवा दवाखाना, कुरकुंभ यांच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियानांतर्गत हे शिबिर घेण्यात आले. वैद्यकीय प्रशासन अधिकारी डॉ. रंगदळ, डॉ. तनुजा गवार्ले, डॉ. शुभम मोहोळकर आणि सेवा दवाखाना, कुरकुंभचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले. परिचारिका अंजना सरक यांनी कर्मचाऱ्यांना कार्यस्थळावरील आरोग्याची काळजी, दैनंदिन आरोग्यदायी सवयी, आजारांपासून बचाव आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. सुरक्षिततेसोबतच वैयक्तिक आरोग्याकडेही गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांनी कर्मचारी राज्य विमा योजना (ईएसआयसी) अंतर्गत विमाधारकांना उपलब्ध असलेल्या विविध योजना, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्यसेवांची माहिती दिली. विमाधारकांनी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा तसेच आरोग्यविषयक समस्या उद्भवल्यास वेळेत वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक वाहन परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना

पुणे : दैनिक संध्या

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२६ लढविणारे उमेदवार यांच्या प्रचाराकरिता उमेदवार आणि त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी यांना वाहन परवानगी देण्याचे अधिकार सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर प्रदान करण्यात येत असल्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले यांनी जारी केले आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघ निवडणूक कार्यक्रम सुरू असून आचारसंहिता लागू आहे. या निवडणुका लढवित असलेल्या उमेदवारांची अंतीम यादी शुक्रवारी (दि. ९) प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निवडणूक लढविणारे उमेदवार, उमेदवार यांचे निवडणूक प्रतिनिधी उमेदवारांच्या प्रचाराकरीता पुणे विभागातील पाचही जिल्ह्यामध्ये वाहनास परवानगी मिळणेबाबत मागणी करीत आहेत. त्यानुसार निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना ज्या जिल्ह्यामध्ये वाहनांची नोंदणी आहे, त्या जिल्ह्यात पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांकरिता वाहन परवानगी सुलभ व तात्काळ मिळण्यासाठी त्या जिल्ह्यातील संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर स्थापन केलेल्या एक खिडकीमधून मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींचा अवलंब करुन वाहन परवानगी देण्यात येणार आहे.

राधेच्या रहस्यमय कवचामुळे गावभर भीती आणि संशयाचं वातावरण निर्माण होतं, सोनी सबच्या हस्तिनापुर के वीरमध्ये

पुणे : दैनिक संध्या

सोनी सबची हस्तिनापुर के वीर मालिका तरुण कौरव आणि पांडवांच्या जडणघडणीच्या काळाचा मागोवा घेते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे तसेच पुढे ते जे बनतात त्याची पायाभरणी करणारे अनुभव उजेडात आणते. या कथेमध्ये राधे (व्यंकटेश पांडे) आहे, ज्याचं धैर्य आणि आपल्या आजूबाजूच्या लोकांचं रक्षण करण्याची नैसर्गिक वृत्ती त्याच्या प्रवासाला सतत आकार देत आहे. इतरांना स्वतःपेक्षा नेहमी प्राधान्य देणाऱ्या त्याच्या निःस्वार्थ स्वभावामुळे तो वेगळा ठरतो.



मात्र, आता एक अनपेक्षित घटना राधेची अशी एक बाजू उघड करणार आहे, जी त्याच्याविषयी लोकांची धारणा बदलून टाकू शकते. आगामी भागांमध्ये, रावणदहनाचा उत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण गाव एकत्र येतं. मात्र, एका अपघातामुळे आग लागते आणि ती झपाट्याने परिसरभर पसरू लागते. गावकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण होतं, तेव्हा राधे स्वतःचा जीव धोक्यात घालून सर्वांना आगीपासून वाचवण्यासाठी पुढे सरसावतो. तो एकामागून एक गावकऱ्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवतो, पण आग सतत पसरत असल्यामुळे स्वतः मात्र मागे राहतो. सर्वांनाच त्याच्यासाठी सुटकेचा कोणताही मार्ग उरलेला नाही असं वाटत असतानाच, राधे आगीतून बाहेर येतो आणि पहिल्यांदाच त्याचं कवच सर्वांसमोर प्रकट होतं. सुरुवातीला गावकरी त्यांच्या जीवाचं रक्षण केल्याबद्दल त्याच्या शौर्याचं कौतुक करतात, पण त्याचं कवच पाहताच ते गोंधळून जातात आणि घाबरतात. त्यांना वाटू लागतं की राधे एखादी दुष्ट किंवा अलौकिक शक्ती असू शकतो. या अनपेक्षित उलगड्यामुळे राधेसमोर एक नवीन आव्हान उभं राहतं, कारण ज्यांच्यासाठी त्याने स्वतःचा जीव धोक्यात घातला, तेच लोक आता त्याच्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतात.

ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांवरील हल्ल्याचा निषेध

पुणे : दैनिक संध्या

कृषी विकास ट्रस्टच्या कॅम्पसमध्ये (बारामती) नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या राष्ट्रीय कार्यकारी परिषदेत एसआरएफटीआयच्या डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या हिंसाचार आणि सामूहिक हल्ल्याचा निषेध करण्यात आला. कोलकाता, पश्चिम बंगाल येथील सत्यजित रे फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटच्या कॅम्पसमध्ये २७ सप्टेंबर २०२६ रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पश्चिम बंगाल शाखेने आयोजित केलेल्या परिचय वर्ग कार्यक्रमावर एसआरएफटीआयच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सूर्यकांत पाठक म्हणाले, ही लोकशाही संवाद आणि कायदेशीर चौकटीत ग्राहक हक्क, सार्वजनिक जागरूकता आणि सामाजिक जबाबदारीसाठी काम करणारी देशव्यापी संघटना आहे. ग्राहक पंचायतीच्या पश्चिम बंगाल शाखेच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर करून आवश्यक शुल्क भरले होते. तसेच २७ सप्टेंबर रोजी एसआरएफटीआयच्या मुख्य सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी संस्था प्रशासनाची पूर्व लेखी परवानगी घेतली होती. कार्यक्रम सुरू होताच एसआरएफटीआयचे काही विद्यार्थी आणि बाहेरील व्यक्तींनी सभागृहात प्रवेश करून आझादी, हिंदू फॅसिझमचा प्रतिकार करा, मला हिंदुत्वाचा तिरस्कार आहे, आरएसएस परत जा अशा घोषणा दिल्या. त्यानंतर ते मंचावर चढले आणि स्वामी विवेकानंद व भारतमातेचे बॅनर फाडून दोन्ही प्रतिमा पायदळी तुडवल्याचा आरोप करण्यात आला.

शिवाजी गणेशन यांच्या तीन ऐतिहासिक तमिळ चित्रपटांच्या ३५ मिमी प्रिंट्स राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात जमा

'थिरुवरुत्चेल्वर'ची NFAI कडे प्रथमच प्रत;'थिल्लाना मोहनांबाल' आणि 'थिरुविलयाडल'च्या अतिरिक्त प्रिंट्समुळे जतनाला बळ

■ पुणे (दै. संध्या)

ज्येष्ठ अभिनेते शिवाजी गणेशन यांच्या अभिनयाने आणि दिग्दर्शक ए. पी. नागराजन यांच्या दिग्दर्शनाने साकारलेल्या तीन गाजलेल्या तमिळ चित्रपटांच्या ३५ मिमी प्रिंट्स राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या (NFDC-NFAI), पुणे येथील संग्रहात दाखल झाल्या आहेत. FTIIच्या फिल्म रिसर्च ऑफिसर अपर्णा सुब्रमणियन यांनी या चित्रपटांच्या प्रिंट्स NFDC-NFAIकडे सुपूर्द केल्या.

या संग्रहात 'थिरुवरुत्चेल्वर' (१९६७), 'थिल्लाना मोहनांबाल' (१९६८) आणि 'थिरुविलयाडल' (१९६५) या तीन चित्रपटांचा समावेश झाला आहे. विशेष म्हणजे, 'थिरुवरुत्चेल्वर'ची कोणत्याही स्वरूपातील प्रत यापूर्वी NFAIच्या संग्रहात उपलब्ध नव्हती. त्यामुळे या चित्रपटाची प्रिंट राष्ट्रीय संग्रहात दाखल होणे महत्त्वपूर्ण मानले जात आहे. 'थिल्लाना मोहनांबाल' आणि 'थिरुविलयाडल' यांच्या उपलब्ध असलेल्या संग्रहित प्रिंट्समध्येही आता आणखी एका जतनयोग्य प्रिंटची भर पडली आहे. विशेषतः 'थिरुविलयाडल'ची NFAIकडे सध्या एकच जतन घटक उपलब्ध असून, नव्याने मिळालेली प्रिंट CinemaScope स्वरूपातील ऑप्टिकली मॉडिफाइड आवृत्ती असल्याचे दिसून आले आहे. नवीन प्रिंट्स उपलब्ध झाल्यामुळे संग्रहालयाला चित्रपटांच्या जतन प्रक्रियेत अधिक लवचिकता मिळणार आहे. एका प्रिंटचे संरक्षण करताना दुसऱ्या प्रिंटचा संदर्भ, तांत्रिक तपासणी, डिजिटायझेशन आणि तुलनात्मक अभ्यासासाठी वापर करता येणार आहे. त्यामुळे जुन्या चित्रपटांच्या संवर्धनाच्या दृष्टीने या प्रिंट्सचे महत्त्व वाढले आहे. NFDCचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम यांनी सांगितले की, भारतीय चित्रपट वारशाचे जतन करण्यासाठी संस्थात्मक संग्रहांसोबतच व्यक्ती आणि संस्थांच्या प्रयत्नांचाही महत्त्वाचा वाटा आहे. या तीन चित्रपटांच्या समावेशामुळे राष्ट्रीय संग्रह अधिक समृद्ध झाला असून, भारतीय चित्रपटसृष्टीतील महत्त्वपूर्ण कलाकृती भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. अपर्णा सुब्रमणियन यांनी सांगितले की, गेल्या साडेतीन वर्षांपासून त्या जुन्या चित्रपटांच्या प्रिंट्स शोधून त्यांचे संकलन व जतन करण्याचे काम करत आहेत. जानेवारी २०२६ मध्ये त्यांनी 'रथकनीर' (१९५४) या चित्रपटाची प्रिंटही NFAIला दान केली होती. आपल्या संग्रहातील निवडक प्रिंट्स योग्य जतन सुविधांनी सुसज्ज सार्वजनिक संग्रहालयाच्या ताब्यात देणे हा या प्रयत्नांचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.ऑगस्ट २०२६ मध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारे या प्रिंट्सचा शोध सुरू झाला. 'थिल्लाना मोहनांबाल'ची प्रिंट चेन्नई येथे मिळाली. FTIIचे माजी विद्यार्थी साई संजय यांच्या सहकार्याने ती पुण्यात आणण्यात आली. त्यानंतर मिळालेल्या माहितीतून 'थिरुविलयाडल' आणि 'थिरुवरुत्चेल्वर' यांच्या प्रिंट्सही शोधण्यात आल्या. NFAIकडे 'थिरुवरुत्चेल्वर'ची प्रत नसल्याचे समजल्यानंतर ती प्रिंट संग्रहालयासाठी मिळविण्यास प्राधान्य देण्यात आले. तिन्ही प्रिंट्स १३ सप्टेंबर २०२६ रोजी चेन्नईहून पुण्यात आणण्यात आल्या.या तिन्ही प्रिंट्समध्ये मॅजेंटा रंग फिका होणे तसेच प्रोजेक्टरमुळे निर्माण झालेल्या उभ्या ओरखड्यांच्या खुणा दिसून येतात. उष्ण आणि प्रतिकूल हवामानातील दीर्घकाळाच्या वापर व साठवणुकीचा त्यावर परिणाम झाल्याचे दिसते. त्यामुळे उर्वरित फिल्म प्रिंट्स संस्थात्मक संग्रहात सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.या संपादनामुळे NFDC-NFAIच्या भारतीय चित्रपट वारशातील उपलब्ध फिल्म घटक शोधणे, संकलित करणे आणि जतन करण्याच्या प्रयत्नांना आणखी बळ मिळाले असून, भविष्यात या प्रिंट्सचा उपयोग संवर्धन, संशोधन, डिजिटायझेशन आणि अभ्यासासाठी केला जाणार आहे.



फुले-आंबेडकरी चळवळीतील ज्ञानवंतांचा सोमवारी सन्मान

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन



■ पुणे (दै. संध्या)

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी-पुणे आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद', पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक अरुण खोरे यांनी दिली आहे. या सोहळ्यात ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार (मुंबई), आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताजी गायकवाड (सोलापूर), ज्येष्ठ पत्रकार व लेखक अशोक गोपाल (पुणे) आणि सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय काळेबेरे (पुणे) यांना सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते, हिंदी भाषेचे ज्येष्ठ विद्वान आणि लेखक डॉ. दामोदर खडसे यांच्या अध्यक्षतेखाली येत्या सोमवारी (ता. १२) सायंकाळी ५ वाजता एस. एम. जोशी फाउंडेशनचे सभागृह, नवीपेठ, पुणे येथे हा सोहळा होणार आहे.

उर्मिला पवार यांनी मराठी साहित्यात मोलाचे योगदान दिले असून, त्यांचे 'आयदान' हे आत्मचरित्र विशेष गाजले आहे. आंबेडकरी आणि स्त्रीवादी चळवळीतील त्यांच्या कार्याची दखल घेतली जाते. दत्ताजी गायकवाड हे गेल्या सहा-सात दशकांपासून आंबेडकरी चळवळ आणि सामाजिक परिवर्तनाच्या विविध आघाड्यांवर कार्यरत आहेत. ज्येष्ठ पत्रकार अशोक गोपाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर संशोधनपर लेखन केले आहे. त्यांच्या 'अ पार्ट अपार्ट: लाईफ अँड थॉट ऑफ डॉ. आंबेडकर' या ग्रंथाला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाला आहे.

शशिकांत कांबळे यांना IMF-जागतिक बँकेच्या वार्षिक बैठकीचे निमंत्रण

■ पुणे (दै. संध्या)

स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत गेनबा कांबळे यांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक समूहाच्या (WBG) २०२६ च्या वार्षिक बैठकीसाठी विशेष निमंत्रण मिळाले आहे.

ही अत्यंत प्रतिष्ठेची बैठक १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान बँकॉक, थायलंड येथे होणार आहे. या बैठकीत जगभरातील अर्थमंत्री, केंद्रीय बँकांचे प्रमुख, जागतिक उद्योग नेते आणि शिक्षणतज्ज्ञ जागतिक अर्थव्यवस्था, गरिबी निर्मूलन आणि सर्वसमावेशक विकास यावर चर्चा करणार आहेत.

१९९१ नंतर ३५ वर्षांनी थायलंडमध्ये होत असलेली ही बैठक आशियाच्या वाढत्या आर्थिक ताकदीचे प्रतीक मानली जाते. पुण्यातील एका कार्यकर्त्यापासून ते जागतिक व्यासपीठापर्यंत स्वान फाऊंडेशनच्या माध्यमातून शशिकांत कांबळे गेली अनेक वर्षे शालेय विद्यार्थ्यांसाठी NASA आणि सिंगापूर सायन्स सेंटरच्या सहकार्याने परीक्षा आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दौरे आयोजित करतात. त्यांच्या याच सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना या जागतिक मंचावर निमंत्रित करण्यात आले आहे. भारती विद्यापीठात १३ वर्षे त्यांनी जनसंपर्क अधिकारी (PRO) म्हणून सेवा बजावली असून, हा त्यांच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील गौरव आहे.



'कोण होणार करोडपती'चा भव्य शुभारंभ

■ पुणे (दै. संध्या)

बॉलिवूडमधील दोन लोकप्रिय आणि दिग्गज अभिनेत्री, पहिल्यांदाच एकत्र आलेली ही जोडी; मनमोकळ्या गप्पा, जुन्या आठवणी आणि काही अनपेक्षित खुलाशांनी रंगणार आहे एक खास संध्याकाळ! सोनी मराठीवरील 'कोण होणार करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमाच्या नव्या पर्वाची सुरुवात येत्या सोमवार, १२ ऑक्टोबरपासून होणार आहे. यंदा माधुरी दीक्षित सूत्रसंचालकाच्या भूमिकेत असून, कार्यक्रमाच्या भव्य शुभारंभाच्या विशेष भागात सोनाली बेंद्रे हॉटसीटवर विराजमान होणार आहे. 'आता खेळ बदलणार' या घोषवाक्याला साजेसा हा विशेष भाग मराठी मनोरंजनविश्वात नव्या पर्वाची नांदी ठरणार आहे.

आपापल्या चित्रपट कारकिर्दीत अनेक यशस्वी भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या माधुरी दीक्षित आणि सोनाली बेंद्रे यांनी आजवर एकाही चित्रपटात एकत्र काम केलेले नाही.



त्यामुळे सोनी मराठीच्या मंचावर पहिल्यांदाच एकत्र दिसणाऱ्या या दोन लोकप्रिय अभिनेत्रींची जोडी प्रेक्षकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे. प्रेक्षकांना बॉलिवूडच्या जुन्या आठवणी, खुसखुशीत गप्पा आणि 'कोण होणार करोडपती'च्या खेळातील उत्कंठा यांचा सुंदर मिलाफ या भागात पाहायला मिळणार आहे.

'एआय'च्या युगात टिकायचे, तर नवकौशल्ये आत्मसात करा

■ पुणे (दै. संध्या)

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षात भारताच्या आत्मनिर्भरतेवर भर दिला आहे. त्यादिशेने वाटचाल करताना सरकारकडून स्वदेशी उद्योग व व्यवसायांना मोठ्या प्रमाणात चालना दिली आहे. देशाच्या सुरक्षेसाठी तयार करण्यात येणारी उत्पादने पुण्यातील 'आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज' तयार करतेय, ही अभिमानाची बाब आहे. तसेच व्यवसाय चालवत असताना समाजसेवा, राष्ट्रासाठी योगदान देणे महत्त्वाचे आहे," असे प्रतिपादन गुजरातचे माजी मंत्री आत्माराम परमार यांनी व्यक्त केले.

अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, उद्योग आणि नवकल्पनांचा संगम घडवून आणणाऱ्या 'एडब्ल्यूटीआयएस २०२६', या तंत्रज्ञान व नवकल्पनाविषयक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत परमार बोलत होते. हिंजवडीतील हॉटेल विवांता येथे आयोजित या कार्यक्रमावेळी आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीजचे अध्यक्ष मुकुंद जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर जगताप, सहकार्यकारी अध्यक्ष स्मिता शितोळे-



जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे उद्घाटन झाल्यानंतर मॉसचीप कंपनीचे उपाध्यक्ष विशाल पाटील यांचे मार्गदर्शन झाले. जगाच्या तुलनेत तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या बाबतीत भारत आता कोणच्या टप्प्यावर आहे, यासह येणाऱ्या काळात एआय, इंटरनेट ऑफ थिंग्ज, वायरलेस टेक्नॉलॉजी, ५-जी तंत्रज्ञान, डेटा सिक्युरिटी आदी विषयांवर त्यांनी विस्तृत विवेचन केले.

'इस्रो'चे माजी शास्त्रज्ञ डॉ. नवलकिशोर गुप्ता यांनी अवकाश तंत्रज्ञानाविषयी सांगताना मंगळयान, चांद्रयान यांच्या निर्मितीचा प्रवास सांगितला. तसेच या उपकरणांमध्ये द्रव हायड्रोजनचा उपयोग, भारताच्या चांद्रयान मोहिमेमध्ये यानासाठी वापरल्या गेलेल्या हायड्रोजनच्या संशोधनामध्ये असलेला सहभाग आणि त्यातील तांत्रिक गोष्टींविषयी माहिती दिली.

'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उद्याच्या सीमेपलीकडे' या विषयावर बोलताना तंत्रज्ञान, अर्थ विषयातील तज्ज्ञ व प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

सरकार एमपीएससी विद्यार्थ्यांच्या हिताचाच विचार करत आहे

■ पुणे (दै. संध्या)

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या पुण्यामध्ये सुरू असलेल्या आंदोलनाचा राज्य सरकार संवेदनशीलपणे विचार करत आहे. त्यांच्या 13 पैकी 12 मागण्या यापूर्वीच सरकारने मान्य केल्या आहेत . केवळ ऑब्जेक्टिव्ह च्या मागणीसाठी हे आंदोलन सुरू आहे. त्या संदर्भातही लवकरच तोडगा निघेल. राज्य सरकार एमपीएससी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करत आहे , परंतु विरोधकांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे भांडवल करून राजकारण करू नये असे आवाहन आमदार शंकर जगताप यांनी केले. एमपीएससी



विद्यार्थ्यांच्या नवी पेठेतील अहिल्यादेवी शिक्षण संस्थे समोर सुरू असलेल्या आंदोलनाला आमदार शंकर जगताप यांनी भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा केली त्यानंतर ते बोलत होते. शंकर जगताप म्हणाले, अहिल्यादेवी शिक्षण संस्थेसमोर सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन हे कोणत्याही राजकीय स्वरूपाचे आंदोलन नाही, येथील विद्यार्थी हे महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून, शेताच्या बांधावरून पुण्यामध्ये शिकण्यासाठी आले आहेत. या विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा संवेदनशील पणे विचार करून सरकारने त्यांच्या 13 पैकी 12 मागण्या यापूर्वीच मान्य केले आहेत. केवळ एका मागणीसाठी या विद्यार्थ्यांचे आंदोलन सध्या सुरू आहेत त्या संदर्भातही सरकार विचार करत आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगात मध्ये काही अनुचित प्रकार घडला, त्या संदर्भात सरकारने विशेष चौकशी समिती नेमली आहे . सरकार या संदर्भात तत्परतेने पावले उचलत आहे. परंतु विरोधक मात्र विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे भांडवल करून आपले राजकीय हित जपण्याचा प्रयत्न करत आहेत. मी स्वतः 1997 ते 2000 सालापर्यंत एमपीएससी चा विद्यार्थी होतो. त्यामुळे सरकारचा प्रतिनिधी आणि विद्यार्थी या दोन्ही नात्याने मला एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी माहिती आहेत. या संदर्भात मी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात या संदर्भात चर्चा करणार आहे असेही आमदार शंकर जगताप यांनी यावेळी सांगितले. एस एम जोशी पुलावर सुरू असलेले एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुख्य मागणी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामासाठी आहे. परंतु कायद्यानुसार ही मागणी शक्य होणार नाही. या संदर्भात विद्यार्थ्यांना आणि त्यांना पाठिंबा असणाऱ्या राजकीय व्यक्तींनाही माहिती आहे, परंतु केवळ राजकीय भांडवल करण्यासाठी हे आंदोलन केले जात आहे असेही शंकर जगताप यांनी यावेळी टीका केली.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रणव संतोष रांधवण | यश रणजीत मासाळ | लखन अनिल शिरसट | कु. वेदांगी सुरेश भिसे | कु. समीक्षा नामदेव म्हेत्रे

ॲथलेटिक्सच्या मैदानात ज्ञानसागरची सुवर्णझेप

सावळ : दैनिक संध्या

सावळ-तालुकास्तरीयशासकीयक्रीडास्पर्धांमध्येज्ञानसागरगुरुकुल,सावळच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी एक सुवर्ण,एक रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली असून,तीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मुलांच्या गटात प्रणव संतोष रांधवण याने १४ वर्षे वयोगटातील ६०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट वेग आणि जिद्दीचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.त्याच्या या दमदार कामगिरीमुळे त्याची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच यश रणजीत मासाळ याने १७ वर्षे वयोगटातील गोळाफेक क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.त्याचीही जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. लखन अनिल शिरसट याने १४ वर्षे वयोगटातील थाळीफेक प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदकाची कमाई केली. मुलींच्या गटातही ज्ञानसागरच्या विद्यार्थिनींनी आपल्या क्रीडा कौशल्याची चमक दाखवली. वेदांगी सुरेश भिसे हिने १४ वर्षे वयोगटातील १०० मीटर धावणे या प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले. तिची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.तर समीक्षा नामदेव म्हेत्रे हिने १४ वर्षे वयोगटातील थाळीफेक प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक मिळविले. ज्ञानसागर गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध केली असून,तालुकास्तरीय स्पर्धेतील या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून आता पुढील स्तरावरही उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य,शिक्षक,क्रीडा शिक्षक व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, "खेळातून शिस्त,जिद्द आणि आत्मविश्वासाची जडणघडण" या उद्देशाने विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देण्यात येत असल्याचे सांगितले.





श्रमदानातून गाळ काढल्याने पिंगोरीचा जय गणेश जलाशय ९४ टक्के पाणीसाठा

■ पुरंदर (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिली असली तरी पिंगोरी येथील ग्रामस्थांनी केलेल्या श्रमदानाचे फळ दिसून येत आहे. श्रमदानातून गाळ काढल्यामुळे पुनर्जीवित झालेल्या जय गणेश जलाशयात आजही ९८.५२ दशलक्ष घनफूट म्हणजेच ९४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

मागील दुष्काळी काळात हा जलाशय पूर्णपणे गाळाने भरला गेला होता. त्याची साठवण क्षमता संपली होती. त्यावेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, रोटरी क्लब, सामाजिक कार्यकर्ते बाबा शिंदे आणि पिंगोरी ग्रामस्थांनी यंत्रसामग्रीच्या सहाय्याने सलग श्रमदान करून तलावातील गाळ उपसून काढला. त्यामुळे तलावाला मूळ क्षमताच नव्हे तर अधिक खोली प्राप्त झाली. याचाच परिणाम म्हणून गेल्या वर्षी मे महिन्यात झालेल्या मान्सूनपूर्व पावसातच तलाव जून महिन्यात ओसंडून वाहू लागला होता. तसेच यंदा जुलै अखेर पिंगोरी-कवडेवाडी खोऱ्यात झालेल्या संततधार पावसाने तलाव पुन्हा भरला. या साठ्यामुळे पिंगोरी, कवडेवाडीसह परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.दरम्यान, गराडे पाटबंधारे शाखेचे शाखाधिकारी अविनाश जगताप यांनी सांगितले की, शासनाच्या नियोजनानुसार सर्वच धरणांमधील पाणी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्यासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे जय गणेश जलाशयातील पाण्याचा वापर शेतीसाठी करू नये. चोरून पाणी उपसणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.शासनाने अशाप्रकारे जलसंधारणाची कामे हाती घेणे गरजेचे आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी करून चालणार नाही. स्वयंसेवी संस्था, ग्रामस्थ यांनी श्रमदानातून गाळ काढला म्हणूनच आज ९४ टक्के पाणी शिल्लक आहे. जर शासनाने प्रत्येक गावात गाळ काढणे, बंधारे दुरुस्ती, पाझर तलावांची खोली वाढवणे अशी कायमस्वरूपी उपाययोजना तातडीने केली तर भविष्यात आमच्या गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणार नाही, अशी मागणी पुरंदर तालुका सरपंच संघटनेच्या अध्यक्षा तथा माजी सरपंच सीमाताई भुजबळ यांनी केली आहे.

हिंदू धर्माविषयीच्या गैरसमजांविरोधात आवाज उठवणे आवश्यक-स्वाती गोयल शर्मा

पुणे: दैनिक संध्या

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात हिंदू धर्माविषयी चित्रपटांच्या माध्यमातून अनेक चुकीचे समज पसरवले जात असल्याचा आरोप करत, या प्रवृत्तीविरोधात समाजाने आवाज उठवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शोध पत्रकार स्वाती गोयल शर्मा यांनी केले. हिंदू धर्माविषयी होत असलेल्या आक्षेपार्ह चित्रणाबाबत समाजाने जागरूक राहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. अरुंधती फाउंडेशन आणि देव देवेश्वर संस्थान यांच्या वतीने सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या सभागृहात सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शंखनाद, ओंकार स्तवन आणि पवित्र मंत्रोच्चारांच्या धार्मिक वातावरणात धर्म व मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या पूर्वजांना आणि हुतात्म्यांना तर्पणाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ विधिज्ञ सदानंद फडके, देव देवेश्वर संस्थानचे रमेश भागवत, अरुंधती फाउंडेशनचे हिमांशू गुप्ते, आदित्य गुप्ते, धर्मशास्त्र संशोधक आर्या जोशी आणि विद्याधर नारगोळकर उपस्थित होते. स्वाती गोयल शर्मा म्हणाल्या, हिंदी चित्रपटांच्या माध्यमातून हिंदू धर्माविषयी चुकीच्या धारणा निर्माण केल्या जात असल्याचे दिसून येते. चित्रपटांमधील धार्मिक विषयांचे चित्रण आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सेन्सॉर बोर्डाची भूमिका आणि चित्रपटांना दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांच्या परिणामकारकतेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. ओटीटी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे चित्रपटांच्या आशयावर नियंत्रण ठेवण्याच्या विद्यमान व्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. अरुंधती फाउंडेशनचे हिमांशू गुप्ते यांनी कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "हरिद्वार येथे घाटावर सामूहिक तर्पण होताना पाहिल्यानंतर पुण्यातही अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याची कल्पना सुचली. पुण्याच्या भूमीला शिवकालापासून अनेक धर्मवीरांच्या बलिदानाचा इतिहास लाभला आहे. या वीरांचे सामूहिक स्मरण व्हावे आणि नव्या पिढीला त्यांच्या इतिहासाची व परंपरेची माहिती मिळावी, या उद्देशाने कार्यक्रम आयोजित केला आहे." ज्येष्ठ विधिज्ञ सदानंद फडके म्हणाले, पितृपंधरवडा अशुभ असतो, ही समजूत चुकीची आहे. हिंदू संस्कृतीत पूर्वजांचे स्मरण आणि त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कालावधी महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे पितृपंधरवड्याबाबत मनात असलेले गैरसमज दूर करून या परंपरेकडे योग्य दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.


श्री महालक्ष्मी मंदिरात भव्य सामूहिक श्रीसूक्त पठण सोहळा सोमवारी

पुणे: दैनिक संध्या

श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या त्रिदेवी स्वरूपाचे पवित्र अधिष्ठान असलेल्या श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग, पुणे येथे सार्वजनिक नवरात्रोत्सव २०२६ निमित्त सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजता भव्य सामूहिक श्रीसूक्त पठण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पवित्र पर्वात श्री महालक्ष्मी देवीची आराधना, भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरणाची अनुभूती देणाऱ्या या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिराच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीसूक्त हे ऋग्वेदातील श्री महालक्ष्मी देवीच्या स्तुतीस समर्पित पवित्र वैदिक स्तोत्र आहे. सुख, समृद्धी, ऐश्वर्य, शांती आणि कल्याण यांचे प्रतीक असलेल्या देवी महालक्ष्मीच्या उपासनेत श्रीसूक्त पठणाला विशेष महत्त्व आहे. सामूहिक पठणातून भक्ती, सकारात्मक ऊर्जा आणि सामूहिक मंगलभावनेचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या विशेष सोहळ्यास पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. श्री महालक्ष्मी मंदिरात रविवार, दि. ११ ऑक्टोबर ते मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत असून, विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून श्रीसूक्त पठण सोहळा संपन्न होणार आहे. पुणे शहरातील सर्व भाविक, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि देवीभक्तांनी या मंगलमय सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीचा आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन श्री महालक्ष्मी मंदिराच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

मोशी-चऱ्होली-चिखली परिसरात उभारणार 'नाना पाटेकर नाट्यगृह'?

■ पिंपरी-चिंचवड: (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्यासाठी मोशी-चऱ्होली-चिखली या वेगाने विकसित होणाऱ्या निवासी पट्ट्यात दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या नावाने भव्य नाट्यगृह आणि बहुउद्देशीय सांस्कृतिक केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. या प्रकल्पासाठी योग्य जागा निश्चित करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा, अशी विनंती त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि विस्तार झपाट्याने वाढत असताना मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी आधुनिक सुविधांनी युक्त सभागृहाची आवश्यकता निर्माण झाली आहे. पुण्यातील गणेश कला क्रीडा मंचाच्या धर्तीवर शहरात मोठ्या आसनक्षमतेचे नाट्यगृह उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर या मागणीला ठोस प्रकल्पाचे स्वरूप देऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी, अशी भूमिका लांडगे यांनी मांडली आहे. याबाबत सर्वसाधारण सभेत सर्वानुमते ठराव मंजूर करावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

मोशी, चऱ्होली आणि चिखली परिसरात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभे राहत असून नागरिकांची वस्ती वाढत आहे. या भागातील नागरिक, कलाकार, नाट्यसंस्था, शाळा आणि महाविद्यालयांना नाट्यप्रयोग, संगीत मैफिली, साहित्य संमेलने, व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध व्हावे, हा या प्रस्तावामागील प्रमुख उद्देश आहे.

मराठी व हिंदी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि सामाजिक क्षेत्रातील दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून प्रस्तावित केंद्राला 'नाना पाटेकर नाट्यगृह व सांस्कृतिक केंद्र' असे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. या माध्यमातून त्यांच्या स्मृती जपण्याबरोबरच नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल आणि शहराच्या सांस्कृतिक ओळखीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पात प्रशस्त रंगमंच, दर्जेदार ध्वनी व प्रकाशयोजना, कलाकारांसाठी स्वतंत्र कक्ष, सरावासाठी जागा, लघु कार्यक्रमांसाठी सभागृह, दिव्यांगसुलभ प्रवेशव्यवस्था आणि आवश्यक सुरक्षा सुविधांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर पुरेसे वाहनतळ, सार्वजनिक वाहतुकीची उपलब्धता आणि परिसरातील वाहतूक व्यवस्थापन यांचा जागा निश्चित करतानाच विचार करावा, असेही लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे. संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन जागा निश्चिती आणि प्रकल्प अहवालाची कार्यवाही तातडीने सुरू करावी, तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

स्थानिक लोकाधिकार सेना महासंघाचा प्रथम वर्धापन दिन जल्लोषात साजरा



■ मुंबई : (दै. संध्या)

स्थानिय लोकाधिकार सेना महासंघाचा प्रथम वर्धापन दिन सोहळा नुकताच मुंबईतील मरीन लाइन्स येथील बिर्ला मातोश्री सभागृहात जल्लोषात पार पडला. या सोहळ्याला मोठ्या संख्येने कामगार वर्ग उपस्थित होता.बेरोजगार भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधींमध्ये प्राधान्य मिळावे, स्थानिक युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण उपलब्ध व्हावे आणि असुरक्षित व असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय्य हक्क व संरक्षण मिळावे हा आमच्या महासंघाचा मूळ उद्देश असल्याचे महासंघाचे अध्यक्ष गजानन किर्तीकर यांनी सांगितले.महासंघाच्या संकल्पनेनुसार कौशल्य विकास केंद्रांची स्थापना, उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षण, स्थानिक युवकांसाठी रोजगारनिर्मिती आणि उद्योजकतेला प्रोत्साहन या माध्यमातून सक्षम व समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार किर्तीकर यांनी व्यक्त केला.

कामगारांच्या प्रश्नांवरही महासंघाने आपली भूमिका स्पष्ट केली. कंत्राटी कामगारांची नियुक्ती करताना आवश्यक परवाने व कायदेशीर तरतुदींचे पालन, समान कामासाठी समान वेतन व लागू लाभ, निश्चित मुदतीवरील कर्मचाऱ्यांचे हक्क तसेच आरोग्यविमा आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या विषयांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, औद्योगिक क्षेत्रात स्थानिक कौशल्याला प्राधान्य मिळवून देणे, कंत्राटी व असंघटित कामगारांचे हक्क जपणे आणि युवकांना स्वावलंबनाकडे नेणे या उद्दिष्टांसाठी महासंघाचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

रामनाथ कोविंद यांच्या हस्ते एकवीरा देवी मंदिराच्या पायथ्याशी पाणपोईचे उद्घाटन

■ कार्ला (दै. संध्या)



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला येथील श्री एकवीरा देवी मंदिराच्या पायथ्याशी भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या पाणपोईचे उद्घाटन भारताचे माजी राष्ट्रपती मा.रामनाथ कोविंद यांच्या हस्ते करण्यात आले. ठाणे येथील माजी आमदार स्व.कांती कोळी आणि स्व. जयश्री कोळी यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र तथा अखिल भारतीय कोळी समाज, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष परेशदादा कोळी यांनी या पाणपोईची उभारणी केली आहे.

नवरात्रोत्सवाच्या काळात श्री एकवीरा देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. या भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होऊ नये आणि आवश्यकतेनुसार पाणी उपलब्ध व्हावे, या सामाजिक जाणिवेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. धार्मिक श्रद्धेला सामाजिक बांधिलकीची जोड देणारा हा उपक्रम भाविकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. स्व. कांती कोळी आणि स्व. जयश्री कोळी यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली ही पाणपोई म्हणजे त्यांच्या स्मृतींना समाजोपयोगी कार्यातून वाहिलेली भावपूर्ण आदरांजली आहे. भाविकांची तहान भागविण्यासाठी आणि त्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आलेला हा प्रयत्न सामाजिक उत्तरदायित्वाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. या कार्यक्रमाला अखिल भारतीय कोळी समाज, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष परेशदादा कोळी, पंचायत समिती सदस्या रेश्मा राजू देवकर, वेहेरगावच्या सरपंच अर्चना संदीप देवकर, मिलिंद बोत्रे, सामाजिक कार्यकर्ते अविनाश देवकर, संजय देवकर, राहुल गांधी, एकवीरा देवी ट्रस्ट, कार्लाचे अध्यक्ष दीपक हुलवडे, प्रदीप वालदे, भारत मुरे, सुनील वरळीकर, राहुल कोटकर, दत्तात्रेय मढवी, निवृत्ती तायडे, गणेश वाघिलकर, विलास कोळी आणि सुरेश गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.यावेळी आदिवासी सामाजिक कार्यकर्ते तथा ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष तथा ट्रायबल फोरमचे कोकण कार्याध्यक्ष सुनील झळके यांचीही विशेष उपस्थिती होती. कोळी समाजातील बांधव आणि भगिनींनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग घेतला.पाणपोईच्या उद्घाटनानंतर कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगतही लाभली. चिंतामणी शिवडीकर, नटसम्राट राजेश खर्डे आणि सुनील झळके यांच्यासह उपस्थित महिला, पुरुष आणि कोळी समाजातील बंधू-भगिनींनी पारंपरिक कोळी नृत्य सादर केले. पारंपरिक कोळी गीतांच्या तालावर सादर झालेल्या नृत्यामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले. कोळी समाजाची सांस्कृतिक परंपरा, लोककला आणि सामूहिक आनंद यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडले. धार्मिक श्रद्धा, सामाजिक सेवा आणि सांस्कृतिक परंपरा यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून साधण्यात आला. स्वर्गीय कांती कोळी व स्वर्गीय जयश्री कोळी यांच्या स्मरणार्थ उभारलेली पाणपोई भाविकांची तहान भागविण्याबरोबरच समाजोपयोगी कार्यातून दिवंगतांच्या स्मृती जतन करण्याचा संदेश देते. *भाविकांची सेवा, दिवंगतांच्या स्मृतींचे जतन आणि पारंपरिक कोळी संस्कृतीचा जागर या तिन्ही गोष्टींचा संगम घडविणारा परेशदादा कोळी यांचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

रसिकांनी अनुभवला 'परंपराशील महाराष्ट्र'चा इतिहास

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरा, संस्कृती, शौर्य आणि लोककलेचा जागर घडविणाऱ्या 'नृत्यकला मंदिर' निर्मित 'परंपराशील महाराष्ट्र' या भव्य महानाट्याची २५ वर्षांनंतर पुन्हा दिमाखदारपणे प्रस्तुती सादर केली . जुन्या आठवणींना उजाळा देत पुन्हा एकदा तोच नाद, तीच ढोलकी, तोच टाळ-मृदंगाचा ठेका आणि महाराष्ट्राच्या मातीचा अभिमान जागवणारा ललकार रंगमंचावर कलाकारांनी जिवंत केला. 'परंपराशील महाराष्ट्र' या महानाट्याची निर्मिती १९९९ साली झाली. या महानाट्याची संकल्पना व दिग्दर्शन गुरु तेजश्री अडिगे यांनी केले, गेल्या २५ वर्षांपासून या कलाकृतीने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख देश-विदेशात करून दिली आहे. सुमारे ४० ते ६० कलाकारांच्या भव्य संचासह सादर होणाऱ्या या महानाट्यात महाराष्ट्राची परंपरा, लोककला, संस्कृती आणि स्वराज्याचा जाज्वल्य इतिहास यांचे प्रभावी दर्शन घडले. भव्य नेपथ्य, दमदार नृत्यरचना, पारंपरिक वाद्यांचा नाद आणि कलाकारांचा जोशपूर्ण अभिनय यामुळे रंगमंच अक्षरशः दुमदुमून गेला. या महानाट्याने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मॉरिशस, सिंगापूर आणि फ्रान्स या देशांमध्येही 'परंपराशील महाराष्ट्र'चे प्रयोग सादर करण्यात आले आहेत. तसेच भारतात शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सव, पुणे फेस्टिव्हल, पिंपरी-चिंचवड महोत्सव आणि अखिल भारतीय नाट्यसंमेलन यांसारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर या महानाट्याची दिमाखदार प्रस्तुती झाली आहे. तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा सादर झालेल्या या महानाट्याला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भूपाळीपासून स्वराज्य शपथेपर्यंतचा प्रवास कलाकारांनी आपल्या दमदार सादरीकरणातून जिवंत केला. या प्रयोगात गुरु तेजश्री अडिगे, सुप्रिया धाईंजे, भानुप्रिया दोशी, वीणा भोसले, सचिन वाघोडे, निखिल निगडे, गणेश कांबळे , प्रणव फराकते, स्वाती इकर, सुजाता कुंभार यांच्यासह अनेक कलाकारांनी आपली कला सादर केली. २५ वर्षांपूर्वी रुजवलेली ही कलाकृती आजही तितक्याच ताकदीने आणि उत्साहाने रंगमंचावर अवतरली, हेच 'परंपराशील महाराष्ट्र'च्या यशाचे वैशिष्ट्य आहे . महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान, मातीचा सुगंध आणि स्वराज्याची प्रेरणा यांचा दणदणीत जागर घडवणाऱ्या या महानाट्याने पुन्हा एकदा रसिकांच्या मनावर ठसा उमटवला.



थोडक्यात पण महत्वाचे



योगदान प्रतिष्ठानच्या वतीनेक्रीडा क्षेत्रातील मुलांचा सत्कार

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धा दिनांक 3 ऑक्टोबर 2026 आणि 4 ऑक्टोबर 2026 रोजी मारुती कंद स्केटिंग ग्राउंड भोसरी आणि PCNDA ग्राउंड भोसरी येथे रोड रेस या प्रकारात स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, या स्पर्धेतील प्रोफेशनल इनलाइन स्केटिंग अंडर 17 या गटात कु. अवनीश राहुल भोईर याने दोन कास्य पदक मिळविले. प्रोफेशनल इन लाईन स्केटिंग अंडर 19 या गटात एस बी पाटील कॉलेज रावेत येथील बारावी सायन्स शाखेचा विद्यार्थी कु. आयुष राकेश सायकर याने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय स्थान प्राप्त करत 4 रोप्य पदक पटकावले त्यांच्या या यशाबद्दल पिंपरी चिंचवड स्केटिंग असोसिएशनचे अध्यक्ष श्री अशोक गुंजाळ सर यांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या तसेच चिंचवडचे विद्यमान नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर यांनी देखील मुलांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

अग्रसेन ट्रस्टतर्फे गोयल, मित्तल, बन्सल, गुप्ता आग्रवाल यांना आज पुरस्कार

चिंचवड : दैनिक संध्या

अग्रसेन जयंतीनिमित्ताने अग्रसेन चिंचवड प्राधिकरण ट्रस्टच्या वतीने दि. ११ रोजी अग्रसेन रत्न,अग्रभूषण, जीवन गौरव पुरस्काराचे आज वितरण होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. हा कार्यक्रम चिंचवड स्टे येथील अग्रसेन ट्रस्टच्या सभागृहात संध्या ७ वाजता होणार आहे. यावेळी डॉ बाल किशन आग्रवाल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन अग्रसेन ट्रस्टचे अध्यक्ष धर्मेंद्र आग्रवाल, सचिव सुनील जयकुमार आग्रवाल,खजिनदार विनोद मित्तल, कार्याध्यक्ष विकास गर्ग यांच्या सह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. १) कृष्णकुमार किशोरीलाल गोयल- अग्रसेन रत्न पुरस्कार (कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष) 2. सुभाष देवीचंद बन्सल - अग्रभूषण पुरस्कार . 3. वेदप्रकाश भाईचंद गुप्ता - अग्रभूषण पुरस्कार. 4. प्रेमचंद रामस्वरूप मित्तल - अग्रविभूषण पुरस्कार 5. कै.शारदादेवी नेमीचंद अग्रवाल- विशेष जीवनगौरव पुरस्कार 6. रामप्यारी जयभगवान गर्ग - जीवन गौरव पुरस्कार 7. कमलादेवी दीनदयाल अग्रवाल -जीवन गौरव पुरस्कार 8. पन्नालाल ग्यानीराम गुप्ता- अग्रसेन श्री पुरस्कार ९ डॉ.संतोष छगनलाल अग्रवाल - अग्रसेन श्री पुरस्कार.

'मी... माझा प्रवास' या चर्चासत्राचे मंगळवारी पीसीसीओई मध्ये आयोजन

पिंपरी : दैनिक संध्या

'मी... माझा प्रवास, अनेक भूमिका आणि सुवर्णमध्य' या चर्चासत्राचे मंगळवारी (दि. १३) पीसीसीओई मध्ये आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता, मेकॅनिकल सेमिनार हॉल येथे होणार आहे. या चर्चासत्रात सिटी प्राईड स्कूलच्या प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे, कायदा सल्लागार ॲड. परिक्रमा खोत, स्त्री रोग तज्ञ डॉ. क्षमा उपलेंचवार, न्यू एज फायर फायटिंग कंपनी संचालक सुजल शाह आदी सहभागी होणार आहेत. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील उद्योजक नरेंद्र लांडगे अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक निळकंठ चोपडे, अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव, अधिष्ठाता डॉ. एस. यु. भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांना कौटुंबिक, व्यावसायिक जबाबदाऱ्या सांभाळताना, वैयक्तिक आयुष्यात समतोल राखताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. या विषयीचे त्यांचे अनुभव, तसेच विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांना त्यांचा व्यवसायिक प्रवास, आव्हाने तसेच दैनंदिन जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळण्याचे व्यावहारिक उपाय आदी विषयांवर महिलांचे विचार मंथन व्हावे त्यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश आहे असे अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव यांनी सांगितले.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांना राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांना उल्लेखनीय प्रशासकीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक प्रदान करण्यात आले. महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) मुंबईतील लोकभवन येथील दरबार हॉलमध्ये आयोजित पदक अलंकरण समारंभात त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले. राष्ट्रपती महोदयांनी १५ ऑगस्ट २०२३ रोजी विनय कुमार चौबे यांना प्रशासकीय सेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर केले होते. त्यानुसार आज आयोजित समारंभात त्यांना हे पदक प्रदान करण्यात आले.

सदस्यांचे वाढदिवस आणि मनोरंजन कार्यक्रम संपन्न



■ पिंपरी (दै. संध्या)

मासिक सभा ठेवण्यात आली. यामध्ये ज्येष्ठांचे वाढदिवस साजरे केले. यात रेखा गिरमे, डॉ .रमेशचंद्र बियाणी ,प्रतिमा कुलकर्णी, हर्षाली देसाई, सुरेखा चौधरी, सुधाकर जगताप, शोभा जोशी ,प्रकाश पानवळकर या सभासदांचे वाढदिवस साजरे केले त्यांनी संघाला देणगी दिली. सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये मनोरंजनात्मक करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले होते.

या कार्यक्रमासाठी स्टार प्रवाह या टीव्ही मालिकेतील प्रसिद्ध रियालिटी शो मधील "मी होणार सुपरस्टार छोटा" उस्ताद बालकलाकार कुमार प्रथमेश गायकवाड याचे सदाबहार गीत सादर करण्यात आले.

प्रथमेश गायकवाड यांच्या मुखातून दिव्य प्रतिभा संपन्न गायिकेचा आवाज ऐकायला मिळाला. हा 14 वर्षाचा मुलगा असून इयत्ता सहावी मध्ये शिक्षण घेत आहे पण गायन कलेमध्ये निपुण आहे.

याच्या गाण्याचा रसस्वाद घेण्यासाठी सभागृह ज्येष्ठांनी भरून गेला होता. त्यामध्ये महिलांची संख्या जास्त होती. छत्रपती शिवाजी महाराज व तानाजी मालुसरे यांच्या भेटीच्या दरम्यान चा पोवाडा गायला. भारुड, गवळण, भजन, अभंग वाणी ,हिंदी व मराठी भक्ती गीत, वारीचा आनंद घेणारे गीत ,अशा प्रकारचे संगीताची मेजवानी सर्वांना दिली. त्याच्या गाण्याच्या तालावर ज्येष्ठांचे पाय थिरकले. या बाल कलाकारांला वाद्यांची साथ मिळाली, ते म्हणजे शिवाजी महाराज गायकवाड ,नितीन महाराज, पखवाज वादक -मुरलीधर गावडे, तबलावादक -वैभव सोळके, हार्मोनियम वादक -दादा बोडके ,यांची संगीत साथ मिळाली. संघातील कुठलाही कार्यक्रम चांगला होण्यासाठी त्यात नियोजनबद्ध व सुसूत्रता असणे आवश्यक असते ते सांभाळणारे संघातील कारभारी व कार्यकर्ते यांची आवश्यकता असते.संघाचे अध्यक्ष भागवत कोल्हे, उपाध्यक्ष मुरलीधर लहाने, सचिव सुरेश बोरकर, कोषाध्यक्ष माधव बरहाटे.यांचे नियोजन आणि ज्ञानेश्वर गिरमे, श्रीकांत रेवणवार, प्रवीण कुलकर्णी ,सुभाष चौधरी ,सुभाष वाणी, नंदकुमार मोदी, या सर्वांची साथ. तसेच फोटोग्राफीमध्ये संगीता साठे व रमेश हिंगणे यांची साथ मिळाली.

नानांचे बेधडक वक्तव्य ऐकून आम्ही झालो होतो अवाक

ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी सांगितली नाना पाटेकर यांच्याशी झालेल्या भेटीची आठवण

■ पिंपरी (दै. संध्या)

नाना पाटेकर यांचा कसदार अभिनय, बेधडकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि भूमिका मग ती गंभीर असो खलनायकाची असो की विनोदी असो प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याची त्यांच्यातील कलावंताची धडपड , नाम फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी त्यांनी उभे केलेले कार्य यामुळे नानांना जवळून भेटण्याची खूप इच्छा होती. या भेटीत नानांशी मनमोकळ्या गप्पा मारता आल्या. मात्र बरमोडा घातलेले नाना शेवटपर्यंत तसेच बोलत राहिले. नानांना भेट म्हणून देण्यासाठी नेलेली बैलगाडी आणि ज्ञानेश्वरी त्यांनी त्याच बर्मोडावर स्वीकारली . वर अजून 'तुम्ही अस्वस्थ का? मी असाच आहे नागडा 'असे बेधडक विधान करून त्यांनी आम्हाला अवाकच केले. अशी आठवण ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी सांगितली.

ज्येष्ठ दिवंगत अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्यानंतर आपण सर्वात अधिक प्रेम कोणावर केले असेल तर ते नाना पाटेकर यांच्या अभिनयावर असे सांगून सातुर्डेकर म्हणाले की, नानांचा कसदार अभिनय, त्याबरोबरच त्यांच्या अंगी असलेला बेधडकपणा यामुळे त्यांना भेटण्याची खूप इच्छा होती. चार-पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचे कार्यकर्ते संदेशकुमार नवले, आबा खराडे आणि मी नानांना भेटायचे ठरवले. माहिती काढली. नाना त्यांच्या शेतावर असल्याचे कळले. नानांचा फटकळ स्वभाव पाहता नाना पटकन काही बोलून आपला अपमान तर करणार नाहीत ना असा प्रश्न पहिल्यांदा मला पडला. नंतर जाऊ दे अपमान झाला



तरी ऐकायला कोण आहे तिघे मित्र आणि नाना असा विचार करून तिघेही रिक्षाने नानांच्या भेटीला गेलो. नाना शेतात भटकंती करून निवासस्थानी परतले. ओळखपाळख झाली.गप्पा झाल्या. मी नुसता पत्रकारच नाही तर कार्यकर्ताही आहे ही माझ्या मित्रांनी माझी ओळख नानाला सांगितली. तेव्हा मला वाटलं नाना आता पटकन काहीतरी म्हणणार. पण नाना म्हणाले नंदू, तुझ्यातला कार्यकर्ता असाच जिवंत ठेव. तेव्हा मी सुटकेचा निश्वास सोडला.

मात्र नाना बरमोडावर असल्याने नानांना भेट देण्यासाठी नेलेली बैलगाडी आणि ज्ञानेश्वरी तशीच हातात ठेवून आम्ही होतो. नाना आता ड्रेस बदलून येतील मग येतील याची वाट पाहत होतो. चहा झाला. गप्पा झाल्या. मग नानाने स्वतःच विचारले ही बैलगाडी आणि ज्ञानेश्वरी मला द्यायला आणली आहे ना ? आम्ही म्हटलं हो. मग द्या ना. आता त्याच स्थितीत बैलगाडी कशी द्यायची? म्हणून आम्ही नानांच्या बरमोडाकडे एक दृष्टिक्षेप टाकला. नानांच्या चाणाक्ष नजरेने ही गोष्ट ओळखली. ते म्हणाले 'मला बरमोडावर काही वाटत नाही. तुम्ही कशाला अस्वस्थ होता ? मी असाच आहे नागडा 'असे म्हणत नानांनी बरमोडावरच ती भेटवस्तू स्वीकारली. वर पत्नीला बोलावून अगं यांना सांग मी कसा आहे? मी पहिल्यापासूनच असा नागडा आहे की नाही हे यांना सांग असा टोलाही आम्हाला लगावला.

नानांचा बेधडकपणा वेळोवेळी जाणवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पूर्वी जोरजोरात ओरडून भाषण करत. त्यावेळी एका कार्यक्रमात 'देवेंद्र एवढं ओरडून भाषण करण्याची गरज नाही' या शब्दात त्यांनी फडणवीस यांना सल्ला दिला होता. पुढे फडणवीस यांनी हा सल्ला आचरणात आणला हे आपण सर्वजण पाहत आहोत असे सातुर्डेकर म्हणाले.

> एका वृत्तपत्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी राजकीय मंडळींकडे निवडून आल्यावर कोट्यावधीची प्रॉपर्टी,गाडी,घोडे कुठून येतात हा केलेला सवाल सर्वसामान्य माणसाच्या मनातला सवाल होता. म्हणूनच नाना पाटेकर केवळ अभिनेता नव्हते. स्पष्ट वक्ते कार्यकर्ते होते. विविध विषयांवर त्यांनी भूमिका घेतली. ही भूमिका घेताना अनेकांना ती आवडली ही नाही पण नानांनी कधी त्याची पर्वा केली नाही त्यामुळेच नाना हे वेगळेच रसायन होते. अशा भावना सातुर्डेकर यांनी व्यक्त केल्या.

आळंदीत दिव्यांगांना मिळणार मोफत मॉड्युलर पाय

■ पिंपरी (दै. संध्या)


श्री क्षेत्र आळंदी देवाची येथे 23 ऑक्टोबर 2026 रोजी दिव्यांग व्यक्तींना मोफत मॉड्युलर पाय मिळणार आहे. त्यासाठी 9820599108/9371088911 या मोबाईल क्रमांकावर पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. आणि शिबिराला येताना आधारकार्ड घेऊन येणे आवश्यक आहे.

कै. आमोद पानसे यांच्या स्मरणार्थ श्रीमती शुभलक्ष्मी पानसे यांच्या देणगीतून श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी यांच्या सहयोगाने भारत विकास परिषद कोथरूड शाखा व दिव्यांग केंद्र पुणे यांचे मार्फत मॉड्युलर पाय, हात व पोलिओ कॅलिपर मोफत बसविण्यासाठी मोजमाप शिबिर घेण्यात येणार आहे. आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून जवळच असणाऱ्या पितळी गणपती मंदिरासमोर हराळे वैष्णव धर्मशाळेत दिनांक 23 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दिव्यांगांसाठीच्या शिबिरात मॉड्युलर पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर बसविण्यात येईल.

आज आळंदी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक श्री ज्ञानेश्वर वीर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दिव्यांग ट्रस्टचे



अध्यक्ष दत्ताजी चितळे यांनी प्रस्तावना केली. आणि दिव्यांग ट्रस्टचे विश्वस्त व दिव्यांग केंद्रप्रमुख विनय खटावकर यांनी शिबिराच्या संपूर्ण नियोजनाची व आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाविषयी माहिती दिली. याविषयी बोलताना खटावकर म्हणाले, कृत्रिम मॉड्युलर पायाची किंमत 50,000 पेक्षा जास्त व कृत्रिम हाताची किंमत 25,000/- रुपया पर्यंत आहे. पण या शिबिरात मॉड्युलर पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर दिव्यांगांसाठी एकदम मोफत देण्यात येणार आहेत. परंपरागत जयपुर फूटपेक्षा हे आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय ऑटोफोल्ड असून वजनाने हलके आहेत. आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय बसवल्यानंतर दिव्यांग व्यक्ती चालणे, पळणे,पोहणे, उडी मारणे, वाहन चालविणे व शेती कामे इत्यादी प्रकारच्या दैनंदिन क्रिया करू शकतात. त्याचप्रमाणे सहा किलोग्रॅम पर्यंतचे वजन कृत्रिम हाताने उचलता येईल. भारत विकास परिषदेने 2024 मध्ये रौप्य महोत्सवी वर्षात घेतलेल्या 1000 दिव्यांगांच्या महाशिबिराची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली आहे. मागील पंचवीस वर्षात 35000 दिव्यांगांना भारत विकास परिषदेने मॉड्युलर पाय दिले आहेत. दिव्यांग व्यक्तींनी 23 ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता आळंदी येथील हराळे वैष्णव धर्मशाळेत उपस्थित राहावे. या ठिकाणी दिव्यांग व्यक्ती व दिव्यांग व्यक्ती बरोबर आलेल्या एका व्यक्तीला मोफत भोजन देण्यात येणार आहे. शिबिराची वेळ सकाळी 9 ते दुपारी 3 अशी राहील, तसेच सर्व जाती धर्माच्या दिव्यांग व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.



बनावट दाखल्यांचा वापर करून पंतप्रधान आवास योजनेचा फ्लॅट हडपला

■ पिंपरी (दै. संध्या)

■ भोसरी एमआयडीसी पोलीसात गुन्हा दाखल

उत्तर प्रदेशातील रहिवासी असलेल्या व्यक्तीने आणि त्याच्या पत्नीने बनावट कागदपत्रांच्या आधारे महाराष्ट्राचा रहिवाशी दाखला मिळवला. त्या दाखल्याच्या आधारे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पीएमआरडीए कडून फ्लॅट मिळवत शासनाची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. ही घटना २१ मे २०२१ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत व्याघ्रगड सहकारी गृहनिर्माण संस्था, सेक्टर नं. १२, भोसरी येथे घडली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अशोक भोगल यांनी गुरुवारी (दि. ८ ऑक्टोबर) रोजी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मोहम्मद दानिश अब्दुल माजिद शेख (वय ४५, रा. भोसरी, पुणे), त्याची पत्नी आणि एजंट इरफान शेख (रा. खराळवाडी, पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोहम्मद दानिशचा जन्म उत्तर प्रदेशात झालेला असताना त्याने खडकी येथील ज्युनिअर कॉलेजचा शाळा सोडल्याचा बनावट दाखला आणि वडिलांचा शाळा निर्गम उतारा एजंटमार्फत बनवून घेतला. या बनावट कागदपत्रांच्या आधारे हवेली तहसील कार्यालयातून महाराष्ट्राचा रहिवाशी दाखला मिळवला. या दाखल्याचा वापर करून पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पीएमआरडीए कडून व्याघ्रगड सोसायटीतील फ्लॅट नंबर ९०४ स्वतःच्या नावावर करून शासनाची फसवणूक केली.

स्पा सेंटर चालकाकडे मागितली ५० हजारांची खंडणी

१० हजार रुपये स्वीकारताना पत्रकाराला जगताप डेअरी येथे अटक

■ पिंपरी (दै. संध्या)

स्पा सेंटर सुरू ठेवायचे असेल तर ५० हजार रुपये खंडणी द्यावी, अन्यथा वर्तमानपत्रात बातम्या छापून व्यवसाय बंद पाडण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरून खंडणीविरोधी पथकाने कारवाई केली. रहाटणी येथील जगताप डेअरी चौकातील साई कॉर्नर परिसरात १० हजार रुपये खंडणी स्वीकारताना एका साप्ताहिकाशी संबंधित पत्रकार अक्षय अरुण वाघमारे (वय ३५ वर्षे रा. ३८ औंध रोड, भाऊ पाटील, पाडळेवस्ती, खडकी, पुणे) याला पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, ओळखपत्र आणि होंडा कंपनीची कार असा एकूण २ लाख ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पा सेंटर चालक साजिद मन्सूर पेंढारी (वय २७) यांनी ९ ऑक्टोबर २०२६ रोजी



खंडणीविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड येथे तक्रार दिली. रहाटणी येथील 'अर्थ स्पा सेंटर'बाबत डायल ११२ वर फोन करून पोलिसांना खोटी माहिती देण्यात आली आणि मानसिक त्रास दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच स्पा सेंटर सुरू ठेवण्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली.

थोडक्यात पण महत्वाचे



कांदा चाळीत साठवलेला कांदा काजळीच्या विळख्यात

कवठे येमाई : दैनिक संध्या

कांद्याला चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी कांद्याची साठवणूक केली; मात्र बदलते हवामान, वाढती उष्णता आणि तापमानातील चढ-उतार यामुळे साठवलेल्या कांद्याला काजळी लागण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. त्यामुळे अधिक दराच्या प्रतीक्षेत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर आता कांदा खराब होण्याचे नवे संकट उभे राहिले आहे.गेल्या काही दिवसांपासून कांद्याला तुलनेने चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी अधिक दर मिळण्याच्या आशेने कांदा चाळीत साठवून ठेवला होता. मात्र, साठवणुकीतील कांद्याचे नुकसान होण्याची शक्यता वाढल्याने अनेक शेतकऱ्यांनी कांद्याची प्रतवारी करून खराब होण्याची चिन्हे दिसणारा कांदा तातडीने बाजारात विक्रीसाठी पाठवण्यास सुरुवात केली आहे. सध्या कांद्याला प्रतिक्विंटल सुमारे चार हजार रुपये दर मिळत असल्याचे कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. भविष्यात आणखी चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने साठवून ठेवलेला कांदा खराब होऊ लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.अधिक दराच्या प्रतीक्षेत राहिल्यास हातात आलेले उत्पन्नही कमी होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. कांद्याच्या साठवणुकीसाठी योग्य वातावरण महत्त्वाचे असते. मात्र, सध्याच्या वाढत्या तापमानामुळे आणि हवामानातील बदलांमुळे चाळीत साठवलेल्या कांद्याची गुणवत्ता खालावण्याचा धोका निर्माण झाला आहे. कांद्याला काजळी लागणे, कांदा खराब होणे आणि विक्रीयोग्य मालाचे प्रमाण घटणे अशा समस्यांमुळे उत्पादकांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. कवठे येमाईच्या रोहिलवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी विलासराव रोहिले यांनी सांगितले की, चाळीत साठवलेल्या कांद्याची नियमित पाहणी केली जात आहे. खराब होऊ लागलेला कांदा वेगळा काढून विक्रीसाठी पाठवला जात आहे. उष्णता वाढत असल्याने उर्वरित कांदाही खराब होण्यापूर्वी बाजारात पाठवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. एकीकडे उत्पादन खर्च, मजुरी आणि साठवणुकीचा खर्च वाढत असताना दुसरीकडे कांदा खराब होण्याचा धोका शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. अधिक दर मिळवण्याच्या आशेने साठवलेला कांदा वेळेआधी विकावा लागत असल्याने अपेक्षित नफा मिळण्याची शक्यता कमी होत आहे.कांद्याला चांगला भाव मिळण्याची प्रतीक्षा करावी की नुकसान टाळण्यासाठी तातडीने विक्री करावी, अशा दुहेरी कात्रीत कांदा उत्पादक शेतकरी सापडले आहेत. त्यामुळे बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कांदा साठवणूक, योग्य प्रतवारी आणि वेळेवर विक्री यांचे महत्त्व पुन्हा एकदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांपुढे अधोरेखित झाले असल्याचे मत ही विलास राहिले यांनी व्यक्त केले आहे.



सोशल मीडियाचा उपयोग ज्ञान प्राप्तीसाठी करण्याची गरज : राजेंद्र दीक्षित

चाकण : दैनिक संध्या

तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडियाचा उपयोग प्रत्येकाने आपल्या ज्ञान प्राप्तीसाठी करण्याची गरज असल्याचे विचार आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते राजेंद्र दीक्षित यांनी व्यक्त केले. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल, आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संस्थापक स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त व शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. त्यावेळी मार्गदर्शन करताना दीक्षित बोलत होते. सोशल मीडियाचा वापर कसा व किती करावा या विषयावर राजेंद्र दीक्षित यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा योग्य वापर, त्याचे फायदे व दुष्परिणाम, विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारे परिणाम आणि सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर मर्यादित व विवेकपूर्ण पद्धतीने करून त्याचा उपयोग ज्ञान प्राप्तीसाठी करावा, असा संदेश त्यांनी दिला. मंडलाधिकारी चेतन कुमार चासकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे होत्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, संचालक ज्ञानेश्वर सातव, उद्योजक मनोहर शेवकरी, उद्योजक श्याम राक्षे, माजी आदर्श मुख्याध्यापक विजयकुमार तांबे, ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, भामा स्कूलच्या प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे आदी उपस्थित होते. प्रा. परमेश्वर कांबळे यांनी स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पुण्यतिथी निमित्त शाळेला ४० पुस्तकांची अनोखी भेट दिली. नगराध्यक्षा मनिषा गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते कांबळे यांचा सन्मान करण्यात आला.

विजयादशमीचा ऐतिहासिक मानकरी जेजुरीचा महाखंडा अद्याप उपेक्षित!

पुरंदर : दैनिक संध्या

विजयादशमीचा सण संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी शस्त्रपूजेला विशेष धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे. श्रीक्षेत्र जेजुरी गडावरील सुमारे तीनशे वर्षांचा इतिहास असलेली, तब्बल ४२ किलो वजनाची ऐतिहासिक तलवार अर्थात 'महाखंडा' आजही उपेक्षित अवस्थेत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेला हा महाखंडा पत्र्याच्या पेटीत ठेवण्यात आला असून, त्याचे योग्य जतन आणि प्रदर्शन करण्याबाबत देवस्थान ट्रस्ट उदासीन असल्याची टीका होत आहे. जेजुरीच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि शस्त्रपरंपरेचे प्रतीक असलेल्या या महाखंड्याचे दर्शन घेण्यासाठी मॉरिशस, रशिया, फ्रान्स, जर्मनी, जपान आणि इंग्लंडसह विविध देशांतील पर्यटक आवर्जून येतात. मात्र, या ऐतिहासिक शस्त्राची माहिती पर्यटकांना त्यांच्या भाषेत उपलब्ध होत नसल्याने त्याच्या इतिहासाची आणि परंपरेची पुरेशी माहिती मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. ग्रामचे मानकरी संतोष खोमणे, देवस्थानचे माजी विश्वस्त अध्यक्ष सुधीर गोडशे, छत्रपती संभाजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन पोटे, देवस्थानचे माजी विश्वस्त संदीप अप्पा जगताप, मल्हारराजे प्रतिष्ठानचे हरिभाऊ रत्नपारखी, मनसेचे उमेश जगताप, सेनेचे किरण दावलकर, शैलेश राऊत आणि भाजपच्या महिला उपाध्यक्षा अलका शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी या विषयावर चिंता व्यक्त केली आहे. विजयादशमीच्या दिवशी भारतीय शस्त्रपरंपरेनुसार खंडोबा देवाच्या ऐतिहासिक तलवारीची पूजा केली जाते. यावेळी तलवारबाजीचे रोमांचक प्रदर्शन आणि शस्त्रकौशल्याचे खेळ सादर करण्याची परंपरा आजही जपली जाते.



जवळार्जुन येथे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा उत्साहात संपन्न

■ जेजुरी : (दै. संध्या)

न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुन येथे पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पुरंदर तालुका क्रीडा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ८ व ९ ऑक्टोबर २०२६ रोजी १४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली यांच्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संस्थेचे सहसचिव दत्तात्रय गवळी, संस्थेचे व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे, मा. मुख्याध्यापक उत्तमराव निगडे, मुख्याध्यापिका लता बोकड, पुणे जिल्हा माध्यमिक संघाचे वरिष्ठ नेते रणजित खारतोडे, सासवडचे मुख्याध्यापक सांगळे सर, जवळार्जुन हायस्कूलचे मुख्याध्यापक सतीश पिसाळ व विविध विद्यालयांतील क्रीडाशिक्षक यांच्या उपस्थितीत झाले. मुख्याध्यापक सतीश पिसाळ यांनी प्रास्ताविक करून मान्यवरांचे स्वागत केले व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या निकालामध्ये मुलींच्या १४ वर्षाखालील गटात यशवंत विद्यालय, मावडी क. प. भाग शाळा, पांडेश्वरने प्रथम, शिक्षणमहर्षी डॉ. पतंगराव कदम विद्यालय, दौंडजने द्वितीय आणि श्री भैरवनाथ विद्यालय, वनपुरीने तृतीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षाखालील मुलींच्या गटात श्री भैरवनाथ विद्यालय, वनपुरी प्रथम, माहूर माध्यमिक विद्यालय, माहूर द्वितीय आणि महर्षी वाल्मीकी विद्यालय, वाल्हे तृतीय क्रमांकावर राहिले. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुनने प्रथम, तर ज्योतिर्लिंग हायस्कूल, गुळुंचेने द्वितीय क्रमांक मिळविला.

मुलांच्या १४ वर्षाखालील गटात निवासी विद्यालय, दिवेने प्रथम, श्री भैरवनाथ विद्यालय, वनपुरीने द्वितीय आणि पंचक्रोशी तांत्रिक विद्यालय, वाघापूरने तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात निवासी विद्यालय, दिवे प्रथम, श्री भैरवनाथ विद्यालय, वनपुरी द्वितीय आणि नायगाव विद्यालय तृतीय क्रमांकावर राहिले. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरीने प्रथम क्रमांक पटकावला. न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुनने द्वितीय, तर वाघिरे महाविद्यालय, सासवडने तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्याची संधी मिळाली.

या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व ग्रामस्थ यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संस्थेचे सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व माजी मुख्याध्यापक उत्तमराव निगडे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन गणेश कोलते , किशोर दरेकर , बाबुराव गायकवाड,सोमनाथ उबाळे व तांदळे सर यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

आरोपीला कठोर शिक्षा करून पीडितेला न्याय द्यावा

■ शिरूर (दै. संध्या)



पुण्यातील विश्रांतवाडी परीसरात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा निषेध करत आरोपीला कठोर शिक्षा करून पीडितेला न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या शिरुर तालुका कार्यकारीणीच्यावतीने शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी शिरूर तालुका अध्यक्ष रामदास जाधव,सचिव दत्तात्रय शिंदे,सहसचिव दिगंबर घायतडक,उपाध्यक्ष गोपाळ बंड,पश्चिम महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष गणपत क्षीरसागर,संतोष शिंदे,गोरख गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,सनी थोरात,प्रितेश फुलडाळे,दादासाहेब साळुंके,अमोल जाधव,राजेंद्र आतकर यांसह उपस्थित होते.

पुण्यातील विश्रांतवाडी परीसरात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना घडलेली असून या घटनेने समाजमन हेलावून गेले असून पॉस्को कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी तसेच पीडितेच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

खुडबाव-पिंपळगाव रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे? ठेकेदाराच्या कारभारावर नागरिकांचे प्रश्नचिन्ह!

■ दौंड (दै. संध्या)



दौंड तालुक्यातील खुडबाव-पिंपळगाव रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित ठेकेदाराच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होण्याची शक्यता आहे. रस्त्याचे काम अपेक्षित दर्जानुसार होत आहे का, याबाबत संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

रस्ते हे गावांच्या विकासाचे महत्त्वाचे माध्यम असतात. मात्र, रस्त्याचे काम करताना गुणवत्तेचे निकष, बांधकामाचे तांत्रिक नियम आणि शासकीय अटींचे पालन होणे आवश्यक आहे. कामामध्ये निष्काळजीपणा झाल्यास सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याबरोबरच नागरिकांना भविष्यात गैरसोयींचा सामना करावा लागू शकतो.

खुडबाव-पिंपळगाव रस्त्याच्या कामाची संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने किंवा जबाबदार यंत्रणेने तातडीने पाहणी करावी. कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य, कामाची जाडी, दर्जा आणि मंजूर अंदाजपत्रकानुसार काम झाले आहे का, याची तांत्रिक तपासणी करावी. तसेच कामात त्रुटी आढळल्यास नियमानुसार संबंधितांवर कारवाई करून आवश्यक त्या दुरुस्त्या करून घ्याव्यात, अशी मागणी करण्यात यावी.

शासकीय कामांमध्ये गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारासोबतच कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही असते. त्यामुळे या रस्त्याच्या कामाची निष्पक्ष चौकशी करून नागरिकांच्या शंकांचे निरसन करणे गरजेचे आहे.

बैलपोळ्यासाठी सजावट साहित्याची दुकाने सजली; मात्र पावसाअभावी बाजारात उत्साह कमी

■ राजगुरुनगर (दै. संध्या)



शेतकरी बांधवांसाठी महत्त्वाचा असलेला बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर शहरातील बाजारपेठेत बैलांच्या सजावटीच्या साहित्याची दुकाने सजली असून. मात्र, यंदा पावसाने पाठ फिरवल्याने आणि दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने बाजारपेठेतील उत्साहावर काहीसा परिणाम झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

बैलपोळा हा शेतकऱ्यांच्या जीवनातील जिव्हाळ्याचा सण असून, वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. मात्र, यंदा पावसाअभावी पिके जळाली असून बहुतांश शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.त्यामुळे दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या बैलपोळा सणानिमित्त सजावटीच्या साहित्याच्या खरेदीकडे शेतकऱ्यांनी काहीशी पाठ फिरवल्याचे चित्र राजगुरुनगरच्या बाजारपेठेत पाहायला मिळत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्रात मोठी क्रांती झाली असून, पारंपरिक बैलजोडीच्या साहाय्याने केली जाणारी नांगरणी आणि शेतीची अनेक कामे आता ट्रॅक्टर व आधुनिक यंत्रांच्या मदतीने केली जात आहेत. त्यामुळे शेतीतील बैलांचा वापर दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे. असे असले तरी, बैलपोळा या सणाचे पारंपरिक महत्त्व आजही कायम आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे असलेले स्थान, त्यांच्याप्रती कृतज्ञता आणि ग्रामीण संस्कृतीची परंपरा जपण्याचे काम हा सण करतो. बैलपोळा सणासाठी राजगुरुनगर बाजारपेठ ,वाडा रोड, पाबळ रोड,जुना मोटार स्टँड परिसरात मातीच्या बैलाबरोबर बैलांचे शिंग रंगविण्याचे रंग,बाशिंगे, घुंगरू माळ, गोंडे, दोर, सजावटीच्या माळा तसेच विविध आकर्षक साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे.

दरवर्षी पोळ्याच्या सणानिमित्त शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची सजावट करण्यासाठी साहित्य खरेदी करतात. मात्र, यंदा पावसाअभावी शेतीसमोरील अडचणी वाढल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झाला आहे.

मराठी साहित्य संमेलन संपन्न

■ चाकण (दै. संध्या)

मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर साहित्य, संगीत, कला व अभिनयाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र साहित्य परिषद चाकण शाखेच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेले हे साहित्य संमेलन मोठ्या दिमाखात संपन्न झाले. या संमेलनात विविध कलांचा आणि साहित्याचा संगम पाहायला मिळाला.

संमेलनाचे अध्यक्षपद सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप सांगळे यांनी भूषवले. तर श्रीशा लँडमार्कचे डायरेक्टर संदेश काळे यांनी स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली. बालकाव्यसंग्रहाचे प्रकाशन व या संमेलनाचे उद्घाटन माजी उपसरपंच रविंद्र धाडगे व माजी चेअरमन भरत बिरदवडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कवयित्री राधिका कुलकर्णी यांच्या 'गोड गोजिरी बालगीते' या बालकाव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. 'गुड मॉर्निंग' चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक संदीप राक्षे आदींच्या उपस्थितीने या बालसाहित्याला नवी दिशा मिळाली.

साहित्य, संगीत, कला आणि अभिनय या चारही क्षेत्रांतील कलाकारांना आणि साहित्यिकांना एकाच मंचावर आणून त्यांच्या विचारांची देवाणघेवाण व्हावी, हा मुख्य उद्देश असल्याचे उद्योजक ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब शिळवणे यांनी सांगितले. यामुळे स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळण्यासही मदत झाली.

संगीत, पथनाट्य आणि कवींचे काव्यवाचन झाले. संमेलनात संगीतकार ज्ञानेश्वर शिंदे आणि गायिका निलम शिंदे यांनी आपल्या सुमधुर आवाजाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. वडवानल कल्चरल ग्रुप चाकण यांच्या वतीने दीपक मांडेकर यांनी दिग्दर्शित केलेले 'या भोंदूनी तुला गंडवलं' हे अंधश्रद्धा निर्मूलनावर प्रहार करणारे प्रबोधनात्मक पथनाट्य सादर करण्यात आले.

तुळापूर,शिवले वस्तीतील जय हनुमान तरुण मंडळाला प्रथम क्रमांकाचा गणराया अवार्ड

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)



हवेली तालुक्यात पुणे शहर अंतर्गत लोणीकंद पोलीस स्टेशनच्या वतीने 'विघ्नहर्ता न्यास कमिटी' यांच्या वतीने घेण्यात आलेल्या गणराया अवार्ड' स्पर्धेतील सर्वेक्षण परीक्षणाच्या माध्यमातून लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या एकूण १६७ गणेशोत्सव मंडळांपैकी उत्कृष्ट सजावट,शिस्तबद्ध काटेकोर नियोजन,आणि समाज प्रबोधन, समाजपयोगी उपक्रमाचे निकषाच्या माध्यमातून परीक्षण सर्वेक्षण पाहणी करून 'गणराया अवार्ड' ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ लोणीकंद पोलीस स्टेशन येथे सभागृहात पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिता रोकडे, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक स्वाती खेडकर, वरिष्ठ पत्रकार शरद पाबळे, पोलीस गोपनीय विभागाचे प्रमुख रितेश काळे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी विघ्नहर्ता न्यास कमिटीचे उत्तमराव भोंडवे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय झुरंगे, पोलीस हवलदार ठानगे, राज्य मराठी पत्रकार परिषदेचे पच्छिम महाराष्ट्राचे अध्यक्ष विजयराव लोखंडे, पवित्रा इंगळे, आदी गावचे पोलीस पाटील, मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये श्री क्षेत्र तुळापूर येथील शिवले वस्तीतील जय हनुमान तरुण मंडळाचा प्रथम क्रमांकाचा 'गणराया अवार्ड'चा मानकरी ठरला. तर द्वतीय क्रमांक क्रमांक डोंगरगाव माळवाडी येथील आदर्श तरुण मंडळ, तृतीय क्रमांक वढू खुर्द येथील बागवान वस्तीतील शिवगणेश तरुण मंडळ ठरले. तर उत्तेजनार्थ क्रमांकाचे मानकरी श्री क्षेत्र वाडेबोल्हाई येथील वाडेगाव गावठाणातील श्री गणेश युवा प्रतिष्ठान, लोणीकंद येथील बालदेव युवा प्रतिष्ठान, न्हावी सांडस मधील स्वामी समर्थ मित्र मंडळ,पेरणे फाटा येथील जगदंब प्रतिष्ठान, बिवरी येथील एकता मित्र मंडळ ठरले आहे.



संपूर्ण भारत 'द बिग बिलियन डेज'साठी सज्ज

सणासुदीचा काळ सुरू होताच फ्लिपकार्टवर एकाचवेळी ६.३ दशलक्ष वापरकर्त्यांची नोंद

■ मुंबई (दै. संध्या)

संपूर्ण भारत द बिग बिलियन डेजसाठी सज्ज झाला आहे. या १३व्या एडिशनच्या पहिल्याच तासात फ्लिपकार्टने एका मिनिटात एकाच वेळी ६.३ दशलक्ष वापरकर्त्यांची नोंद केली, ज्यामुळे देशातील सणासुदीच्या खरेदी हंगामाला धमाक्यात सुरुवात झाली. या पहिल्या तासात भारतातील प्रत्येक १५व्या ऑनलाइन खरेदीदाराने फ्लिपकार्टला भेट दिली, नियमित तासाच्या तुलनेत भारतातील ६ पटीहून अधिक व्यक्तींनी या प्लॅटफॉर्मवरून खरेदी केली आणि नवीन ग्राहकांमध्ये ३४ टक्के वाढ झाली. फ्लिपकार्ट प्लस, ब्लॅक मेंबर्स आणि फ्लिपकार्ट को-ब्रँड कार्ड सदस्यांसाठी ८ ऑक्टोबरच्या मध्यरात्री अर्ली ॲक्सेस सुरू झाला, ज्यामध्ये संपूर्ण भारतातील ग्राहकांनी मोबाईल्स, इलेक्ट्रॉनिक्स, लार्ज अप्लायन्सेस, ब्युटी, लाइफस्टाइल आणि होम उत्पादनांची खरेदी केल्याने २८७ दशलक्षहून अधिक सेशन्सची नोंद झाली. या सुरुवातीच्या तासामधून भारतात सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात केलेली ऑनलाइन खरेदी आणि फ्लिपकार्ट देशाच्या कानाकोपऱ्यातील ग्राहकांना देत असलेल्या सर्वोत्तम सेवा दिसून येतात.

टीबीबीडी २०२६ च्या पहिल्या काही तासांमधील सर्वात स्पष्ट संकेत म्हणजे, ही मागणी कुठून येत आहे. पहिल्या तासातील जवळपास प्रत्येक २ पैकी १ भेट तृतीय श्रेणीची शहरे आणि त्यापुढील भागांतून आली. नॉन-मेट्रो ग्राहकांचे मागणीत अंदाजे ६० टक्के प्रमाण होते, ज्यामध्ये सेल सुरू होताना सरदुलगढ, पांशकुरा, शेखपुरा आणि किशनगंज ही शहरे सर्वात वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये आघाडीवर होती. प्रीमियम आणि फ्लॅगशिप स्मार्टफोन्सच्या संपूर्ण श्रेणीमध्ये मोबाईल्सना मोठी मागणी दिसून आली, ज्यामध्ये परवडणाऱ्या पर्यायांनी स्पष्ट वाढ घडवून आणली: ४ पैकी एका ग्राहकाने प्रॉडक्ट एक्सचेंजची निवड केली आणि ३ पैकी एका ग्राहकाने नो कॉस्ट ईएमआयचा पर्याय निवडला. गेल्या वर्षीच्या किमतीत उपलब्ध असलेल्या एन्ट्री-लेव्हल ५जी मॉडेल्सनीही मूल्याधारित खरेदीला मोठी चालना दिली.

पहिल्या तासात लार्ज अप्लायन्सेस श्रेणीत वार्षिक ३० टक्के वाढ झाली, ज्यामध्ये एसी, रेफ्रिजरेटर आणि वॉशिंग मशिन्सना मोठी मागणी होती. वैयक्तिक तंत्रज्ञान अपग्रेड करण्याच्या सणासुदीच्या तीव्र इच्छेला सादर करत टॅब्लेट्समध्ये वार्षिक ७३ टक्के वाढ नोंदवली गेली.

पुरुषांचे ग्रूमिंग आणि सेल्फ-केअर उत्पादनांच्या नेतृत्वाखाली पहिल्या तासात ब्युटी श्रेणीत वार्षिक ४२ टक्के वाढ झाली. सर्वाधिक मागणीच्या काळात, फ्लिपकार्टवर दर मिनिटाला मेन्स परफ्यूमचे १,६०० हून अधिक युनिट्स विकले जात होते, ज्यामधून निदर्शनास येते की, सणासुदीच्या खरेदीमध्ये पर्सनल केअर उत्पादनांना प्राधान्य दिले जात आहे.

नियमित दिवसांच्या तुलनेत फ्लिपकार्ट मिनिट्सच्या ऑर्डर्समध्ये पहिल्याच तासात ३.५ पट वाढ झाली, तर नवीन ग्राहकांमध्ये ११ पटीने वाढ नोंदवली गेली. ही मागणी केवळ रोजच्या अत्यावश्यक वस्तूंवरच मर्यादित न राहता प्रीमियम इलेक्ट्रॉनिक्स, ग्रूमिंग आणि वेअरेबल्सपर्यंत विस्तारली. मेट्रो शहरांबाहेरील मागणी विशेषतः मोठी होती, ज्यामध्ये सुरुवातीच्या टप्प्यात 'मिनिट्स'वर वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांमध्ये द्वितीय श्रेणीच्या व त्यापलीकडील शहरे आघाडीवर होती.

अर्ली ॲक्सेस दरम्यान, फ्लिपकार्ट मिनिट्सच्या माध्यमातून नवी दिल्लीतील एका ग्राहकापर्यंत अवघ्या ३.४ मिनिटांत आयफोन १७ डिलिव्हर करण्यात आला. एअर फ्रायर्स, लॅपटॉप्स आणि एक्सटर्नल हार्ड ड्राईव्ह्स या इतर लोकप्रिय खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये समाविष्ट होत्या.

अर्ली ॲक्सेस दरम्यान कंटेंट-आधारित खरेदीने मोठा सहभाग मिळवला. १,००० हून अधिक तासांचे लाइव्ह कॉमर्स आणि ५,००,००० हून अधिक शॉर्ट-फॉर्मेट व्हिडिओंनी १२.७ दशलक्ष वापरकर्त्यांना फ्लिपकार्टच्या व्हिडिओ आणि लाइव्ह अनुभवांकडे आकर्षित केले. मेट्रो शहरांबाहेर व्हॉइस सर्चचा मोठ्या प्रमाणावर वापर दिसून आला, ज्यामध्ये द्वितीय श्रेणीच्या व त्यापलीकडील बाजारपेठांमधून सुमारे ६४ टक्के वापरकर्ते होते, आणि लाइफस्टाइल व मेकअप उत्पादने ही सर्वाधिक शोधल्या गेलेल्या श्रेणींमध्ये आघाडीवर होती.

विक्रेते आणि एमएसएमईंसाठी सुरुवातीची गती

टीबीबीडी भारतामधील विक्रेता परिसंस्थेतील वाढीला मोठी चालना देत आहे. अर्ली ॲक्सेसच्या दिवशी, व्यवहार करणाऱ्या ५१ टक्के विक्रेत्यांनी नियमित दिवसांच्या तुलनेत २ पट वाढ नोंदवली. एमएसएमई आणि लहान व्यवसायांसह भारतातील द्वितीय श्रेणीच्या व त्यापलीकडील बाजारपेठांमधील विक्रेत्यांमध्ये २.९ पट वाढ झाली, ज्यामध्ये भिवंडी, पानीपत, तिरुपूर आणि हिसार या वाढीमध्ये अग्रस्थानी होते. टीबीबीडी २०२६ चे सुरुवातीचे तास एकच गोष्ट दर्शवतात: भारतातील नागरिक सण साजरा करताना लवकर खरेदी करत आहे, मूल्याधारित खरेदी करत आहे आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून खरेदी करत आहे. हे १३वे एडिशन आतापर्यंतचे भौगोलिक आणि लोकसंख्याशास्त्रीय दृष्टीने सर्वात सर्वसमावेशक एडिशन म्हणून सुरू झाले आहे.

जनरेशन झेडने सणासुदीच्या काळात सेल्फ-केअर आणि वैयक्तिक स्टाइलकडे वळण्याच्या ट्रेंडचे नेतृत्व केले. तरुण खरेदीदारांमध्ये ब्युटी श्रेणीत ४८ टक्के आणि वॉचेसमध्ये ४२ टक्के वाढ झाली, तर फॅशन आणि पर्सनल केअर श्रेणीत स्नीकर्स, परफ्यूम्स, स्किनकेअर, क्रिएटिन आणि जीन्स या सर्वाधिक शोधल्या गेलेल्या वस्तूंमध्ये अग्रस्थानी होत्या.

थोडक्यात पण महत्वाचे



अशोक हरिभाऊ जाधव यांचा सत्कार

मुंबई : दैनिक संध्या

विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात समाजसेवक तथा अभिरा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष अशोक हरिभाऊ जाधव यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार समाजसेवक श्याम पवार यांच्या हस्ते करण्यात आला.या समवेत विजयकुमार गुछ्या निलम यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार भूमय्या सोमा व शंकर इप्पाकायल यांच्या हस्ते करण्यात आला.या प्रसंगी मंडळाचे सचिव नासिकेत पानसरे, सल्लागार तथा ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक कृष्णा काजरोळकर, सल्लागार वासुदेव कदम,सी.के.सर्वगोड आदींची अशोक जाधव यांच्या विषयी गौरवपूर्ण भाषणे झाली.तर निलम यांच्या सेवाभावी व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. प्रभात समयी मंडळाच्या गायकांनी गाणी गाऊन वातावरण प्रफुल्लित केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी केले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खजिनदार गौतम नि.डांगळे, उपसचिव श्रध्दानंद निकम, भूमय्या सोमा, बबन माने आदींनी मेहनत घेतली होती.

बनावट नोंदणीप्रकरणी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून कठोर कारवाई

मुंबई : दैनिक संध्या

परदेशी वैद्यकीय पदवीधरांच्या (एफएमजी) नोंदणीमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) ऑनलाइन नोंदणी पोर्टलमध्ये छेडछाड झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी परिषदेने तातडीने दखल घेतली असून, महाराष्ट्र सायबरमार्फत सखोल तपास सुरू आहे. दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची भूमिका परिषदेने स्पष्ट केली आहे. परिषदेच्या अंतर्गत तपासणी आणि नोंदणी अभिलेखांच्या छाननीदरम्यान ही अनियमितता उघडकीस आली. प्राथमिक चौकशीत २२ संशयित परदेशी वैद्यकीय पदवीधर आढळून आले. यानंतर ऑनलाइन नोंदणी प्रणालीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. तसेच संबंधित व्यक्तींना मूळ कागदपत्रांसह पडताळणीसाठी परिषदेसमोर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी परिषदेने १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र सायबरकडे अधिकृत तक्रार दाखल केली. तपासादरम्यान महत्वाचे धागेदोरे हाती लागले असून, पुढील तपास सुरू आहे. या तपासात परिषद संबंधित यंत्रणेला पूर्ण सहकार्य करीत आहे. वैद्यकीय व्यवसायातील नैतिकता, कायदेशीरता आणि वैद्यकीय नोंदणीची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी परिषद कटिबद्ध आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी मिळविणे किंवा ऑनलाइन प्रणालीमध्ये छेडछाड करणे असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. रुग्णांचे संरक्षण आणि राज्यात केवळ पात्र व पडताळणी केलेले डॉक्टरच वैद्यकीय व्यवसाय करतात, याची खात्री करणे हा वैद्यकीय नोंदणीचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे नागरिकांनी डॉक्टरांच्या नोंदणीची खात्री महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावी आणि संशयास्पद माहिती आढळल्यास ती परिषदेला कळवावी, असे आवाहन परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

आधुनिक फीड तंत्रज्ञानातून मत्स्यपालनाला नवी दिशा – मंत्री नितेश राणे

मुंबई : दैनिक संध्या

मत्स्यव्यवसाय व ॲक्वाकल्चर क्षेत्राची उत्पादकता, कार्यक्षमता, शाश्वतता आणि नफा वाढविण्यासाठी आधुनिक पोषण तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. आंध्र प्रदेशातील सागरी व मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व कार्यपद्धतींच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान त्यांनी येथील नेक्सजेन फीड्स या अत्याधुनिक उत्पादन व ॲक्वाकल्चर सोल्युशन्स केंद्राला भेट दिली. भारतातील प्रमुख ॲक्वाकल्चर फीड उत्पादक कंपनी असलेल्या दीपक नेक्सजेनच्या या केंद्रात मंत्रीराणे यांनी आधुनिक मत्स्य व कोळंबी पोषणामागील विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेतली. कच्च्या मालाच्या प्रक्रियेपासून फीड निर्मिती व फॉर्म्युलेशन, गुणवत्ता तपासणी तसेच मत्स्यपालनासाठी विकसित करण्यात आलेल्या विशेष उत्पादनांपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेची पाहणी यावेळी करण्यात आली. नेक्सजेनच्या किंगफिश आणि आयफीड या ब्रँडअंतर्गत उपलब्ध उत्पादनांसह व्हॅनामी कोळंबीसाठीचे विशेष फीड, फंक्शनल न्यूट्रिशन, प्रोबायोटिक्स, मिनरल्स, फीड ॲडिटिव्ह्ज तसेच मत्स्यपालनातील आरोग्यविषयक विविध उपाययोजनांची माहिती मंत्री राणे यांनी घेतली. मत्स्य व कोळंबीची निरोगी वाढ, फीडचा कार्यक्षम वापर, सातत्यपूर्ण पोषण आणि जलगुणवत्ता सुधारण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचाही त्यांनी अभ्यास केला.

पाकिस्तानात "धाराऊ" या मराठी चित्रपटाचा डंका

■ मुंबई (दै. संध्या)

'धाराऊ... ती गाय नाय... माय हाय!' या लक्षवेधी टॅगलाइनसह चर्चेत आलेल्या आगामी मराठी चित्रपट 'धाराऊ'चा अधिकृत टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील जीवनशैली, भारतीय संस्कृती आणि गोमातेप्रती असलेली श्रद्धा यांची झलक या टीझरमधून पाहायला मिळते. एका लहान मुलाचे आणि गायीचे भावनिक नाते अधोरेखित करणारा हा टीझर प्रेक्षकांमध्ये चित्रपटाविषयी उत्सुकता निर्माण करत आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाला जगभरातून २६ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत त्यात आश्चर्य म्हणजे पाकिस्तानातील पेशावर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'बेस्ट डेब्यू फीचर फिल्म' पुरस्कार मिळाल्याची माहिती दिग्दर्शक मनिष सुरेश शिंदे यांनी दिली. चित्रपटाच्या विषयाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही दाद त्यांच्यासाठी अभिमानाची बाब आहे. दिग्दर्शक मनिष सुरेश शिंदे चित्रपटाविषयी सांगतात, "मला सांगायला आनंद होत आहे की धाराऊ या माझ्या पहिल्याच मराठी चित्रपटाला जगभरातून तब्बल २६ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. प्रत्येक जण आपल्या



■ चित्रपटाचा अधिकृत टीझर प्रदर्शित

परीने गोमातेच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कार्य करत असतो. कुणी गोशाळा उभारून गोपालन करतो, तर कुणी विविध माध्यमांतून जनजागृती करतो. मी चित्रपटाच्या माध्यमातून माझे योगदान देण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. हिंदू धर्मात गायीला मातेचे स्थान का दिले जाते, ती पूजनीय का मानली जाते, या भावना आणि विचार 'धाराऊ'च्या माध्यमातून मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. या चित्रपटाला पाकिस्तानातील पेशावर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'बेस्ट डेब्यू फीचर फिल्म' पुरस्कार मिळाला, ही माझ्यासाठी विशेष अभिमानाची गोष्ट आहे. पाकिस्तानसारख्या देशातही या चित्रपटाची दखल घेतली गेली आणि पुरस्काराने गौरवण्यात आले, याचा मला आनंद आहे. २३ ऑक्टोबरला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत असून, माझ्या भावना आणि चित्रपटामागचा विचार प्रेक्षकांपर्यंत नक्की पोहोचेल, अशी मला आशा आहे." 'धाराऊ'मधून गोमातेप्रती श्रद्धा, माणुसकी, ग्रामीण संस्कृती आणि भावनिक नात्यांचा वेध घेण्यात आला आहे. चित्रपटाच्या शीर्षकातूनच या नात्याची भावनिक खोली जाणवते. टीझरमधील ग्रामीण परिसर, धार्मिक स्थळांची पार्श्वभूमी आणि गायीच्या सहवासातील बालपणाची झलक कथेविषयी कुतूहल वाढवते. बुलढाणा अर्बन मीडिया हाऊस आणि हिंदचित्र फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती श्री. राधेश्यामजी चांडक (भाईजी), डॉ. श्री. सुकेशजी झंवर आणि सौ. कोमलजी झंवर यांनी केली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन मनिष सुरेश शिंदे यांनी केले आहे. 'धाराऊ' हा मराठी चित्रपट २३ ऑक्टोबर २०२६ पासून महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. अधिकृत टीझर आणि चित्रपटाला मिळालेल्या पुरस्कारामुळे आता प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाविषयीची उत्सुकता आणखी वाढली आहे.

बाळाच्या पापणीवरील हिमनजिओमावर शस्त्रक्रियेशिवाय यशस्वी उपचार

■ मुंबई (दै. संध्या)

■ नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमध्ये पेडियाट्रिक ऑप्थॅल्मॉलॉजी आणि कार्डिओलॉजी विभागांचा एकत्रित पुढाकार

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टरांनी एका तान्ह्या बाळाच्या पापणीवरील इन्फंटाईल हिमनजिओमावर प्रोप्रानोलॉल या औषधाच्या मदतीने यशस्वी उपचार केले. या उपचारात शस्त्रक्रिया किंवा चीरफाड करण्याची गरज भासली नाही. पेडियाट्रिक ऑप्थॅल्मॉलॉजीच्या कन्सल्टंट डॉ. हिमिका गुप्ता आणि पेडियाट्रिक कार्डिओलॉजीचे सिनियर कन्सल्टंट व क्लिनिकल लीड डॉ. सुप्रतिम सेन यांनी समन्वयाने ही केस हाताळली. इन्फंटाईल हिमनजिओमा ही रक्तवाहिन्यांपासून तयार होणारी सौम्य गाठ असून, बाळाच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या महिन्यांत तिची वाढ वेगाने होऊ शकते. त्वचेवर लाल डाग किंवा स्ट्रॉबेरीसारखी सूज दिसत असल्याने पालक अनेकदा त्याकडे सामान्य खूण म्हणून पाहतात. मात्र, पापणीवर अशी गाठ असल्यास ती बाळाच्या दृष्टीच्या विकासावर परिणाम करू शकते. पापणीवरील हिमनजिओमामुळे पापणी खाली झुकण्याची समस्या (टोसिस) निर्माण होऊ शकते. त्यामुळे डोळा पूर्णपणे उघडण्यास अडथळा येऊन दृष्टीच्या नैसर्गिक विकासावर परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणून अशा गाठींचे वेळेवर निदान आणि योग्य उपचार महत्त्वाचे ठरतात. या प्रकरणात डॉक्टरांनी शस्त्रक्रियेऐवजी प्रोप्रानोलॉल औषधोपचाराचा पर्याय निवडला. हे औषध गाठीतील रक्तवाहिन्यांवर परिणाम करून तिचा आकार आणि लालसरपणा कमी करण्यास मदत करते. मात्र, लहान बाळांमध्ये हे औषध देताना हृदयाचे ठोके आणि रक्तदाब कमी होण्याची शक्यता असल्याने वैद्यकीय देखरेख आवश्यक असते. डॉ. सुप्रतिम सेन यांनी सांगितले की, प्रोप्रानोलॉल हे उपचारांची गरज असलेल्या इन्फंटाईल हिमनजिओमासाठी महत्त्वाचे प्रथम श्रेणीतील औषध आहे. या बाळाने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला असून, क्लिनिकल मूल्यांकनानुसार पुढील सहा ते बारा महिने उपचार सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

राज्यातील १,०५८ आश्रमशाळांमध्ये एकाच दिवशी पट पडताळणी

■ मुंबई (दै. संध्या)

■ आदिवासी विकास विभागाची राज्यव्यापी विशेष मोहीम यशस्वी

आदिवासी विकास विभागाच्या वतीने राज्यातील शासकीय व अनुदानित अशा एकूण १,०५८ आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येची अचूकता तपासण्यासाठी एकाच दिवशी विशेष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ५०० शासकीय आणि ५५८ अनुदानित आश्रमशाळांचा समावेश होता. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आणि शालेय अभिलेखांतील नोंदी यांची पडताळणी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत या मोहिमेचे नियोजन करण्यात आले होते. आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी ३० सप्टेंबर २०२६ अखेरच्या विद्यार्थी पटसंख्येच्या अनुषंगाने विशेष पटपडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपर आयुक्त आणि प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती.

उपयुक्तता आणि सौंदर्यदृष्टीचा संगम साधत वास्तूचे वैशिष्ट्य जपावे

सभापती प्रा. राम शिंदे : सुसज्ज 'मनोरा आमदार निवास'ची नूतन वास्तू फेब्रुवारी, २०२८ पूर्वी सेवेत

■ मुंबई (दै. संध्या)




महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी महाराष्ट्र विधानमंडळानजीकच्या नूतन मनोरा आमदार निवासाच्या सुरु असलेल्या बांधकामाची पाहणी केली. हे बांधकाम वेगाने प्रगतीपथावर असून 'अ' आणि 'ब' असे इमारतीचे दोन्ही मनोरे सर्व सुसज्ज सोयी सुविधांसह फेब्रुवारी, 2028 पूर्वी आमदारांच्या सेवेत येणार आहेत. 'अ' मनोऱ्याचे सर्व 29 मजले बांधून पूर्ण झाले असून 'ब' मनोऱ्याचे 42 पैकी 34 मजले पूर्ण झाले आहेत. सभापती प्रा. शिंदे यांनी यावेळी सर्व संबंधितांना उपयुक्तता आणि सौंदर्यदृष्टीचा संगम साधत वास्तूचे वैशिष्ट्य जपण्यात यावे, काळजीपूर्वक वापर व्हावा यादृष्टीने नियमावली सुनिश्चित करण्यात यावी, तसेच अगोदरच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन व्हावे, असे निर्देश दिले. सर्व सन्माननीय सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहायक, अभ्यागत, कार्यालय यादृष्टीने एकत्रित असा सुसज्ज निवासी कक्ष या नूतन मनोरा आमदार निवासमध्ये तयार करण्यात येत आहे. उपहारगृहे, पार्किंग, बैठक कक्ष इत्यादी सुविधा असणार आहेत. या पाहणी प्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-1 जितेंद्र भोळे, सचिव-4 शिवदर्शन साठ्ये, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता, प्रज्ञा वाळके, कार्यकारी अभियंता विद्याधर पाटसकर, वास्तुविशारद अतुल प्रभू, प्रकल्प व्यवस्थापक (एल ॲण्ड टी) सतिश राघवन, प्रकल्प सल्लागार फोट्रेस इन्फ्राकॉमचे श्री. कैलास आदी उपस्थित होते.

साबुदाणा खिचडीपासून राजगिऱ्याच्या भाकरीपर्यंत

सोनी सबचे कलाकार त्यांचे आवडते नवरात्रीचे पदार्थ आणि उत्सवाच्या परंपरा शेअर करत आहेत

■ मुंबई (दै. संध्या)

नवरात्री हा श्रद्धा, कुटुंब आणि परंपरांचा उत्सव आहे आणि या सणात खाद्यपदार्थांनाही विशेष महत्त्व असतं. दिलासा देणाऱ्या साबुदाण्याच्या पदार्थांपासून ते पौष्टिक राजगिऱ्याच्या पदार्थांपर्यंत आणि घरी बनवल्या जाणाऱ्या उपवासासाठीच्या आवडत्या खाद्यपदार्थांपर्यंत, हा उत्सव उपवास पाळताना परिचित चवींचा आनंद घेण्याचे अनेक पर्याय देतो. या नवरात्रीनिमित्त सोनी सबचे कलाकार तोरल रसपुत्रा, गुलकी जोशी, मनीष वाधवा आणि करुणा पांडे यांनी त्यांच्या आवडत्या उपवासाच्या पदार्थांबद्दल आणि या उत्सवी काळात पाळल्या जाणाऱ्या खास खाद्यपरंपरांबद्दल सांगितले. कुंतीची भूमिका साकारणाऱ्या तोरल रसपुत्रा यांनी सांगितले, "माझ्यासाठी नवरात्री साबुदाणा खिचडीशिवाय अपुरीच आहे. ती साधी, समाधान देणारी आहे आणि उपवासाच्या दिवसांत मी तिची मनापासून





वाट पाहत असते. मला ती भाजलेल्या शेंगदाण्यांसोबत आणि थोड्या दह्यासोबत खायला आवडते, त्यामुळे ती पोटभर आणि समाधानकारक वाटते. उपवासाच्या पदार्थांबद्दल मला सर्वात जास्त आवडणारी गोष्ट म्हणजे अगदी साधे घटक एकत्र येऊन किती चवदार पदार्थ तयार होतात. नवरात्रीत लहानपणापासून खाल्लेल्या पदार्थांच्या आठवणीही यांच्याशी जोडलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्याशी एक छान आपलेपणाची भावना जोडलेली आहे."

डॉ. सृष्टी अग्रवालची भूमिका साकारणाऱ्या गुलकी जोशी यांनी सांगितले, "राजगिरा हा नवरात्रीदरम्यान माझ्या सर्वात आवडत्या पदार्थांपैकी एक आहे, विशेषतः त्याच्या भाकऱ्या किंवा साधं थालीपीठ बनवलं की. मला त्याची बहुपयोगीता खूप आवडते आणि उपवासाच्या दिवसांत त्यातून सहजपणे पौष्टिक आणि समाधानकारक जेवण तयार करता येतं. आमच्या घरी नवरात्रीतील खाद्यपदार्थांचा भर नेहमीच साधेपणा आणि ताजेपणावर असतो, मोठमोठे पदार्थ बनवण्यापेक्षा. या छोट्या-छोट्या परंपरांमुळे सण अधिक खास वाटतो आणि दरवर्षी त्यांचं पालन करण्याचा मला आनंद मिळतो."

भीष्म पितामहची भूमिका साकारणारे मनीष वाधवा यांनी सांगितले, "नवरात्री हा माझ्यासाठी साध्या, पारंपरिक खाद्यपदार्थांकडे परत जाण्याचा काळ असतो. कुट्टूची भाकरी आणि उपवासाचे बटाटे हा माझ्या सर्वात आवडत्या पदार्थांपैकी एक आहे, विशेषतः जेव्हा ते ताजेतवाने घरी बनवलेले असतात. दिवसभरात फळं आणि मूठभर सुकामेवा खायलाही मला आवडतं. या परिचित चवींमध्ये एक वेगळाच दिलासा असतो आणि माझ्यासाठी या खाद्यपरंपरा पाळल्यामुळे सणाचा आनंद आणखी खास बनतो." पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या करुणा पांडे यांनी सांगितले, "मला उपवासातील बटाट्याच्या पदार्थांविषयी विशेष आवड आहे, विशेषतः सैंधव मीठ, हिरव्या मिरच्या आणि थोडं जिरं घालून बनवलेली साधी रेसिपी.


हा असा पदार्थ आहे ज्याला स्वादिष्ट लागण्यासाठी खूप काही लागतेच असं नाही. नवरात्रीदरम्यान मला हलकं, पौष्टिक आणि घरगुती वाटणारं अन्न खायला आवडतं. उपवासाच्या परंपरांबद्दल मला आणखी एक गोष्ट आवडते, ती म्हणजे त्या आपल्याला आपण काय खातो याबद्दल सजग राहायला शिकवतात, आणि तरीही सणाला खास बनवणाऱ्या चवी आणि विधींचा आनंद घेण्याची संधी देतात."

यादें, हस्तिनापुर के वीर आणि पुष्पा इम्पॉसिबल पाहण्यासाठी सोनी सबवर ट्यून इन करा.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



वाचन संस्कृती रुजणे ही काळाची गरज: डॉ. राजाराम गावडे

भिगवण : दैनिक संध्या

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भिगवण येथील ग्रंथालय व मराठी विभागाच्या वतीने 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवणे, साहित्याविषयी आवड निर्माण करणे आणि लेखकांच्या साहित्यिक अनुभवांचा परिचय करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल बनसोडे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर येथील मराठी विभागप्रमुख डॉ. राजाराम गावडे यांनी मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात त्यांनी वाचन संस्कृती रुजणे ही काळाची गरज आहे असे नमूद केले तसेच कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिगवण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुण्यांचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविकात डॉ. अनिल बनसोडे यांनी ते पुणे येथे सर परशुरामभाऊ महाविद्यालयात तृतीय वर्ष बी एस मानसशास्त्र विषयाचे विद्यार्थी असताना "संकेत शोधन उपपत्ती" या विषयावर पहिलं पुस्तक लिहिले होते. असे सांगितले. तसेच, लेखक होताना काय अनुभव येतो, लेखन कौशल्य, लेखन शास्त्र हे आजच्या पिढीला लवकर कमी वयात समजले तर उद्याचे उत्तम लेखक तुमच्या मधून उदयास येतील. असे ते म्हणाले. आजची तरुण पिढी ही मोबाईल पाहण्यात व्यस्त झालेली दिसत आहे ती एकमेकांशी संवाद साधण्यास विसरली आहे मोबाईलच्या व्यसनामुळे ग्रंथालयातील अनेक पुस्तके पान उघडता पडून राहिलेले चित्र आपणास पहावयास मिळत आहे.तरुणाईने ग्रंथालयातील पुस्तके वाचून तसेच विचार विनिमयाच्या माध्यमातून आपली प्रतिभा वाढवावी.आपला वक्तशीरपणा जर वाढला तरच आपणास वाचण्यासाठी किंवा कोणत्याही गोष्टी मधील अचूकपणा टिपण्यासाठी वेळ भेटेल अशी खंत इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजाराम गावडे सर यांनी व्यक्त केली. इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण येथील ग्रंथालय व मराठी विभाग आयोजित."लेखक आपल्या भेटीला" या कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते.डॉ. राजाराम गावडे पुढे म्हणाले वाचनाच्या अभावाने आजच्या तरुणाईची मने सुन्न झाली आहेत आपण आपला बहुमूल्य वेळ वाचनासाठी दिला तर आपले विचार प्रगल्भ होऊन आपणही लेखक होणार हे निश्चित आहे.कारण वाचण्यातून आपल्याला अनेक विचारवंताचे विचार वाचण्यास मिळतील आणि आपली बुद्धी अधिक तल्लक होईल. शेवटी 'वाचाल तर वाचाल 'असा सल्ला तरुणाईला त्यांनी दिला.आणि मोबाईल या साधनाचा वापर आपले कौशल्य वाढवण्यासाठी करावा सल्ला दिला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.तानाजी मगर सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्यासाठी अधिकाधिक विचारवंतांचे विचार ऐकण्याचे आवाहन केले . कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. धनाजी मत्रे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सारिका पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा.रोहन व्यवहारे, प्रा.गणेश मोरे, प्रा. प्रकाश करे, प्रा. सचिन आरडे, प्रा. समीर बळे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी - विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून तयार झालेल्या 'वारी'वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

मुंबई: दैनिक संध्या

पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स 2026'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे हे जागतिक पटलावर उमटलेले प्रतिबिंबच आहे. महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तिमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी 22 मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूर वारी ही भक्तीमार्गातील अतिशय प्राचीन परंपरा असून ती जात, धर्म, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्वांना विठुरायाच्या रंगात रंगवून एकत्र आणते. ही महान परंपरा, तिचे उद्दिष्ट आणि विचार जगभरात पोहोचवण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'पंढरपूर वारी – इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' ही सुंदर डॉक्युमेंट्री तयार करून रिलीज करण्यात आली आहे. या डॉक्युमेंट्रीला 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स 2026 मध्ये भारत देशासाठीचा 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यासाठी माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांचे मी अभिनंदन करतो. वारीची गौरवशाली परंपरा जगासमोर मांडणारे माहितीपट सर्वांनी पाहावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव व महासंचालक ब्रिजेश सिंह म्हणाले की, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विविध देशांमधून सादर झालेल्या दर्जेदार निर्मितींमधून या माहितीपटाची भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली. या बहुमानामुळे महाराष्ट्राची भक्तीपरंपरा, संतसाहित्य, सामाजिक समतेचा संदेश आणि वारीची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.

घरावर तुळशीपत्र ठेवणारा अवलिया अखेर नागपुरात आढळला

भिगवण : दैनिक संध्या

ऐहिक सुखाच्या हव्यासापोटी, द्वेष अन् स्वार्थापोटी हपापलेल्या माणसाच्या गर्दीत माणूस सापडणे कठीण झाला, अशी प्रतिक्रिया नेहमीच सर्वत्र ऐकावयास मिळते. अशात घरावर तुळशीपत्र ठेवून मुक्या जीवांसाठी झटणारा आणि या जनावरांच्या हक्काचे घर मोडले जाणार असल्याची कल्पना आल्याने, स्वत:च निराश्रित होण्याचा निर्णय कुणी घेऊ शकतो का, असा प्रश्न उपस्थित झाल्यास अपवाद वगळता प्रत्येकच जण नाही असेच म्हणेल. मात्र, घरावर तुळशीपत्र ठेवून जगणारा एक अवलिया उपराजधानीत आढळला आहे. राजूभाई उर्फ राजेश पंड्या असे या अवलियाचे नाव असून, त्यांचे अपहरण झाल्याची चिंता वजा चर्चा गेल्या महिनाभरापासून उपराजधानीत सुरू होती. त्यामुळे केवळ कुटुंबीयच नव्हे तर विविध सामाजिक संघटना, संस्था, व्यक्ती अन् खुद्द पोलिसही अस्वस्थ झाले होते.



बांधकाम मजुरांच्या गुणवंत मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे उल्लेखनीय यशाबद्दल सन्मान; सहायक कामगार आयुक्तांची गौरवोद्गार

■ पुणे : (दै. संध्या)

आई-वडील दिवसभर बांधकामावर डोक्यावर विटा वाहतायेत, ओझी उचलताहेत... त्याच गोंधळात मुले एखाद्या मातीच्या ढिगाऱ्यावर बसून किंवा लहानशा खोलीत बसून अभ्यास करताहेत... हे चित्र आपण आजूबाजूला बांधकामाच्या ठिकाणी पाहतो. प्रतिकूल परिस्थितीतही आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत मेहनतीने अभ्यास करुन दहावी, बारावी, पदवी आणि उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे यश खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे. हेच लक्षात घेऊन बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे केंद्राच्या वतीने बांधकाम कामगारांच्या गुणवंत मुलांचा सत्कार करुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी खास सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर सहाय्यक कामगार आयुक्त दत्तात्रय पवार, अजयश्री सोशल फाऊंडेशनचे संचालक अजयकुमार लोळगे, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, पुणेचे अध्यक्ष अजय गुजर, उपाध्यक्ष राजाराम हजारे, सचिव महेश राठी व कोषाध्यक्ष सुशील अग्रवाल उपस्थित होते. यावेळी संस्थेचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजीत मोरे, महाराष्ट्र प्रदेश माजी अध्यक्ष जगन्नाथ जाधव, सुनील मते, पुणे कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष रविंद्र भोसले व रयत शिक्षण संस्थेच्या पुणे विभाग सदस्य व निसर्ग ऋण फाऊंडेशनच्या अध्यक्ष अर्चना सोनावणे आदी उपस्थित होते.

दत्तात्रय पवार म्हणाले, बांधकाम कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षण घेता यावे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि कामगार कुटुंबांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. पात्र बांधकाम कामगारांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी मंडळाकडे नोंदणी करून नोंदणीचे वेळोवेळी नूतनीकरण करावे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या यशाचे कौतुक करणे, हा या उपक्रमाचा स्तुत्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. शैक्षणिक मदतीबरोबरच बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मातृत्व लाभ, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्तीवेतनाशी संबंधित योजनांचाही उल्लेख करण्यात आला. बांधकाम कामगारांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळाल्यास त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला हातभार लागू शकतो. त्यामुळे कामगारांनी शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व लाभ घ्यावा. आयुष्यात यश मिळवायचे असेल तर कष्ट आणि शिक्षण यांना पर्याय नाही असेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले.

अजयकुमार लोळगे म्हणाले, बिल्डर्स असोसिएशनच्या माध्यमातून कन्स्ट्रक्शन करत असताना कन्स्ट्रक्टीव्ह काम होते ही अतिशय आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांना या सत्कारासोबतच मार्गदर्शन, शैक्षणिक सहकार्य आणि इंटर्नशिपसारख्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी सुचवले. विद्यार्थ्यांनीही आपल्या क्षमतेनुसार इतरांना मदत करण्याची भावना जोपासावी. शिक्षण घेत असताना मिळणारे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव समाजाच्या उपयोगी आणण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा आणि त्यांच्या भविष्यातील करिअरला दिशा मिळावी, यासाठी इंटर्नशिप कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात, असे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष अजय गुजर प्रास्ताविक करताना म्हणाले, पाया भक्कम असेल तर इमारत भक्कम होते. त्याचप्रमाणे शिक्षणाचा पाया भक्कम असेल तर आयुष्य चांगले आकार घेते. आपण कोणाची मुले आहोत हे न पाहता मेहनत, स्वप्न मोठी ठेवावीत आणि त्या स्वप्न पूर्ण होण्यासाठी कष्ट घ्यावेत. बिल्डर्स असोसिएशन नेहमीच बांधकाम मजूर आणि त्यांच्या मुलांच्या कल्याणासाठी उपक्रम राबवित असते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष व कार्यक्रम समन्वयक राजाराम हजारे, अभियंता मित्र मासिकाचे संपादक डॉ. कमलकांत वडेलकर यांनी मनोगत व्यक्त केले. महेश राठी यांनी आभार मानले आणि संजय आपटे, मधुर डागा यांनी सूत्रसंचालन केले.

दुष्काळाच्या सावटाखाली लासुर्णे गावात बैलपोळा उत्साहात साजरा

■ वालचंदनगर : (दै. संध्या)

दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या इंदापूर तालुक्यातील लासुर्णे गावात यंदाचा बैलपोळा उत्साहात साजरा झाला. नापिकीच्या संकटाला तोंड देतानाही गावातील शेतकऱ्यांनी आपली पारंपरिक बैलपोळा सणाची परंपरा जपत गावात एकोप्याचे व चैतन्याचे वातावरण निर्माण केले.

गावातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना स्वच्छ धुवून, शिंगांना रंगरंगोटी करून, गळ्यात झूल, घंटा व फुलांच्या माळा घालून सजविले.

पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा करून त्यांची ओवाळणी करण्यात आली.या वर्षी दुष्काळामुळे शेतीला मोठा फटका बसला असूनही लासुर्णे गावाने यंदाही बैलपोळा हा शेतकरी संस्कृतीचा उत्सव थाटात साजरा केला. गावातील ज्येष्ठ शेतकऱ्यांनी लहान मुलांना बैलपोळ्याचे महत्त्व समजावून सांगितले, तर महिलांनी रांगोळी काढून सणाला पारंपरिक रूप दिले. शेतकऱ्यांनी कठीण परिस्थितीतही सण साजरा करून आशेचा किरण दिला आहे.



प्रवाशांनी कृपया लक्ष द्या! नाशिक-मुंबई रेल्वेसेवेला १७ ऑक्टोबरला 'ब्रेक'



■ मुंबई: (दै. संध्या)

मुंबईला जाणाऱ्या नाशिककरांसाठी ऑक्टोबरच्या मध्यात रेल्वे प्रवासाचे नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे. आसनगाव-कसारा तिसऱ्या मार्गिकेच्या कामासह कसारा यार्डातील 'अप' यार्ड विस्तारीकरणासाठी १४ ते १८ ऑक्टोबरदरम्यान विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे.

यामुळे नाशिक-मुंबई रेल्वेसेवेवर मोठा परिणाम होणार असून १७ ऑक्टोबरला नांदेड-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस नाशिक रोडवरच थांबणार आहे. नाशिक रोड ते मुंबईदरम्यानची सेवा रद्द करण्यात आली आहे. याच दिवशी हिंगोली डेक्कन-मुंबई जनशताब्दी आणि हजूर साहिब नांदेड-मुंबई एक्स्प्रेस मनमाडपर्यंतच धावणार आहेत. त्यामुळे नाशिक रोड आणि मनमाड येथून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागू शकतो. दुसरीकडे मुंबई-नांदेड वंदे भारत मुंबईऐवजी नाशिक रोडवरून, तर मुंबई-हिंगोली जनशताब्दी आणि मुंबई-नांदेड एक्स्प्रेस मनमाडवरून सुरू करण्यात येणार आहेत. ब्लॉकमुळे मुंबई, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि दादरहून सुटणाऱ्या अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत.

स्मार्ट सिटीसाठी अखंडीत वीजपुरवठा आणि स्मार्ट पार्किंग आवश्यक – गोयल

प्रवाह बिझनेस एक्स्पोमध्ये महिंद्रा पॉवरॉल जनरेटर आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सच्या आधुनिक उपाययोजनांचे प्रदर्शन

■ पुणे : (दै. संध्या)

झपाट्याने वाढणारे शहरीकरण आणि औद्योगिक विकासाच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटीच्या निर्मितीसाठी आधुनिक पायाभूत सुविधा, अखंडित वीजपुरवठा आणि स्मार्ट पार्किंग व्यवस्था अत्यंत आवश्यक आहे. केवळ रस्ते आणि इमारतींचा विकास पुरेसा नसून, तंत्रज्ञानावर आधारित सुविधाही शहरांना अधिक सुव्यवस्थित आणि सोयीस्कर बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचे संचालक नरेंद्र गोयल यांनी व्यक्त केले.

पुणे अग्रवाल समाजाच्या वतीने १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान डेक्कन कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात येणाऱ्या 'प्रवाह बिझनेस एक्स्पो'च्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. उद्योग, व्यावसायिक आस्थापना आणि रिअल इस्टेट क्षेत्रासाठी विश्वसनीय वीजपुरवठा आणि आधुनिक पार्किंग व्यवस्था ही काळाची गरज बनली असल्याचे त्यांनी सांगितले. गोयल म्हणाले



की, रुग्णालये, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्स, औद्योगिक आस्थापना आणि निवासी संकुलांमध्ये अखंडित वीजपुरवठ्यासाठी महिंद्रा पॉवरॉल जनरेटर उपयुक्त पर्याय ठरतात. तसेच, इंटेलिपार्किंग सिस्टिम्सच्या आधुनिक उपाययोजनांमुळे मर्यादित जागेतही अधिक कार्यक्षम पार्किंग व्यवस्था उभारणे शक्य होते. यावेळी यामिनी गोयल यांनी सांगितले की, श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स जनरेटर निर्मिती आणि ऊर्जा उपाययोजनांच्या क्षेत्रात वेगाने विस्तार करत आहे. पुणे, मुंबई, नाशिक, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर यांसह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये कंपनी आपली व्यावसायिक उपस्थिती अधिक मजबूत करत आहे.

कंपनी देशांतर्गत बाजारपेठेबरोबरच निर्यातीच्या संधींवरही विशेष लक्ष केंद्रित करत आहे. जनरेटर निर्मिती क्षेत्रातील देशातील प्रमुख दहा उत्पादक कंपन्यांमध्ये स्थान मिळविण्याच्या दिशेने कंपनीची वाटचाल सुरू असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रवाह बिझनेस एक्स्पोमध्ये महिंद्रा पॉवरॉल जनरेटरचे प्रदर्शन खुल्या जागेत करण्यात येणार असून, इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचा स्टॉल क्रमांक २१२ असेल. या प्रदर्शनाच्या माध्यमातून उद्योजक, बांधकाम व्यावसायिक, विकासक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्रतिनिधींना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळण्याबरोबरच व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

